मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १७८ ■ शनिवार, ०७ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## युवा उद्योजक मा गणेश प्रकाश भोसले यांचा पुरस्कार देऊन गौरव

**दैनिक युवक आधार**
**सणसर/विकास क्षत्रिय** : पुणे येथे गुरुवार दि.5 फेब्रुवारी रोजी आयोजित महाराष्ट्र बिझनेस आयकॉन पुरस्कार सोहळ्यात इंदापूर तालुक्यातील सणसर येथील गरीब उद्योग समूहाचे युवा उद्योजक मा.गणेश प्रकाश भोसले यांना 2025 चा युवा उद्योजक पुरस्कार प्रदान करण्यात आला.हा पुरस्कार मराठी चित्रपट सृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांच्या हस्ते मा.गणेश भोसले यांना प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागातील उद्योगसमूहाला नवी दिशा



देत रोजगारनिर्मिती करणाऱ्या मा.गणेश भोसले यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान मिळाला.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी मा.गणेश भोसले यांच्या जिद्दीचे कौतुक करत ग्रामीण भागातील तरुणांसाठी ते प्रेरणादायी ठरतील,असे मत व्यक्त केले. या सन्मानामुळे सणसर गावातील तसेच इंदापूर तालुक्यातील युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून,ग्रामीण उद्योजकतेला नवे बळ मिळाले आहे.

# अनुदानित शाळांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांची माहिती आता सार्वजनिक होणार

### शिक्षण संचालनालयाचा मोठा निर्णय

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी अरविंद बनसोडे कुरनूरकर** : आज खाजगी अनुदानित शाळांमधील कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी आज महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालयाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आज या राज्यातील सर्व अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती आता 'शालार्थ' प्रणालीवर सार्वजनिक करण्यात येणार आहे. माहिती अधिकार



अधिनियम, २००५ च्या तरतुदींनुसार हा निर्णयही घेण्यात आला असून, यामुळे शिक्षण क्षेत्रातील पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे.

**नेमकी काय माहिती उपलब्ध होणार?**

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर यांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, कर्मचाऱ्यांची खालील माहिती अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल:

आज या कर्मचाऱ्याचे नाव आणि पदनाम.

संस्थेचे व शाळेचे नाव.

सेवेत रुजू झाल्याचा दिनांक.

सेवानिवृत्तीचा महिना व वर्ष.

मिळणारे एकूण वेतन.

'शालार्थ' प्रणालीवर होणार प्रसिद्ध

ही सर्व माहिती https://shalarth.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. या प्रक्रियेसाठी आवश्यक तांत्रिक बदल करण्याचे निर्देश महाआयटीच्या बिझनेस अनालिस्टना देण्यात आले आहेत.

**पारदर्शकतेसाठी उचललेले पाऊल**

अनेकदा अनुदानित शाळांमधील पदभरती आणि वेतनाबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. ही माहिती सार्वजनिक झाल्यामुळे सामान्य नागरिकांना आणि संबंधित घटकांना एका क्लिकवर अधिकृत माहिती उपलब्ध होईल. शिक्षण विभागाने ४ मार्च २०२६ रोजी हे आदेश निर्गमित केले असून, याची अंमलबजावणी तातडीने करण्याचे निर्देश विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

## श्री धापुदेवी भट्टळ इंग्लिश मीडियम प्री – प्रायमरी स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी पोस्ट ऑफिस उपक्रमाचे यशस्वी आयोजन

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी सचिन ठाकूर :** धामणगाव रेल्वे तालुक्यात शिक्षणासाठी अग्रेसर व प्रसिद्ध असणाऱ्या धामणगाव रेल्वे एज्युकेशन सोसायटी दारासंचालित श्री धापूदेवी भट्टळ इंग्लिश मीडियम प्री प्रायमरी स्कूल येथे K.J १ च्या विद्यार्थ्यांसाठी पोस्ट ऑफिस उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद देत या कार्यक्रमाचा उद्देश च्या सोशल मीडिया तसेच डिजिटल युगातही




कपाल वाहक म्हणजेच पोस्टमन याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजून सांगण्यात आले होते तसेच शिक्षकांनी मुलांना सांगितले की आपल्या घरी पत्रे पार्सल तसेच महत्त्वाची कागदपत्रे पोहोचवतात ते लोकांना एकमेकांशी जोडण्याचे महत्त्वाचे कार्य करत असतात तसेच एका शब्दांना दुसऱ्या जवळ पोहोचवण्याचा दुवा म्हणून मन हा काम आणि आनंदाचे संदेश घराघरात पोहोचवण्याची काम पोस्टमन हा करत असतो या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या मदतीने साडीवर आपले विचार लिहिलेले होते त्यानंतर मुलांनी शाळेत ठेवलेल्या विशेष पोस्ट बॉक्स मध्ये स्वताची पोस्ट टाक बनवून टाकलेली होती या कृतीमुळे मुलांना प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळाले असून त्यांचा संवाद कौशल्याचा विकास सुद्धा झालेला होता या कार्यक्रमाला विशेष स्थान देण्यासाठी पोस्टमास्टर आशिष चौधरी यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमाला लागली होती तसेच या कार्यक्रमाला यशस्वीरीचा पार पाडण्यासाठी शाळा व्यवस्थापकाचे विशेष सहकार्य लाभलेले होते तसेच शाळा व्यवस्थापकाने शिक्षक आणि पालकाच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करत हा उपक्रम यशस्वी व स्मरणीय ठरल्याचे सांगितले..

## अकबर शेख यांची 'संपादक पत्रकार असोसिएशन, महाराष्ट्र राज्य'च्या महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धी प्रमुखपदी नियुक्ती

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)** – श्रीरामपूर येथील पत्रकार अकबर शेख यांची "संपादक पत्रकार असोसिएशन, महाराष्ट्र राज्य" या संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धी प्रमुख या महत्त्वपूर्ण पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र संघटनेचे संस्थापक अध्यक्ष इस्माईल एस. शेख यांनी प्रदान केले.अकबर शेख हे श्रीरामपूर (ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर) येथील रहिवासी असून ते पत्रकारिता क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत.



त्यांच्या पत्रकारितेतील कार्याची दखल घेत संघटनेने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे.सदर नियुक्ती ३१ डिसेंबर २०२७ पर्यंत वैध राहणार असून, त्यांच्या कार्याची गुणवत्ता व कार्यक्षमता लक्षात घेऊन भविष्यात पुढील पदाबाबत विचार करण्यात येणार असल्याचे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.या पदाच्या माध्यमातून अकबर शेख यांनी पत्रकार बांधवांच्या हितासाठी, तसेच संघटनेच्या उद्दिष्टानुसार पत्रकारिता क्षेत्रात सकारात्मक व विधायक कार्य करावे, अशी अपेक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.दरम्यान, या नियुक्तीबद्दल अकबर शेख यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## ज्ञानदा महिला महाविद्यालयात मराठीचा गौरव ; विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग"

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/लाखनी भंडारा** : महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी व साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी साजरा केला जाणारा मराठी भाषा गौरव दिन तिरोडा तालुक्यातील वडेगाव येथील ज्ञानदा महिला महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य छोटू देवपुरी पुरी यांच्या हस्ते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनी व प्राध्यापकांनी मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेला उजाळा देत कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य छोटू देवपुरी पुरी यांनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, संपूर्ण महाराष्ट्रात मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. मराठी ही आपली मायबोली



असून तिच्या जतन व संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक मराठी माणसाची आहे. मराठी भाषेचा गौरव करत तिच्या समृद्ध वारशाचा अभिमान बाळगणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय रंगारी यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. अविनाश कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. एस. एच. गौरखेडे, ए. एस. वासनिक, आर. डी. काटेखाये तसेच दिगंबर राऊत, चंद्रशेखर उपरीकर, रत्नदीप बडोले, सुमेध शहारे, छाया राऊत, सानिया बिसेन व ममता बडगे यांनी सहकार्य केले.

## डेहणे महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण व विविध गुणदर्शन समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ/खेड पुणे** : हुतात्मा राजगुरू शिक्षण प्रसारक मंडळाचे,

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय डेहणे. ता. खेड, जि. पुणे. येथे दि. ४ मार्च २०२६ वा. बुधवार रोजी सकाळी ठीक ११ वा. महाविद्यालयाच्या सभागृहात वार्षिक पारितोषिक वितरण व विविध गुणदर्शन समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यानिमित्ताने संस्थेचे संस्थापक/ अध्यक्ष आमदार श्री. दिलीपराव दत्तात्रय मोहिते पाटील, संस्थेचे सचिव साहित्याचार्य, प्राचार्य. डॉ. शिवाजीराव मोहिते, संस्थेच्या खजिनदार सौ. सुरेखाताई मोहिते पाटील, नवनियुक्त जिल्हा परिषद सदस्य श्री. समीर सुपे, विपला फाउंडेशनचे कर्मचारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर




भागवत उपप्राचार्य प्रा. सिलदार पावरा, कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. महेश रानवडे, लिटिल चॅम्पचे प्राचार्य.श्री. संतोष वायकर विधी महाविद्यालयाचे प्रा. अभिजीत शेवाळे, मराठी विभाग व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. राहुल गायकवाड आणि महाविद्यालयातील सर्व विभागांचे विभाग प्रमुख व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पारितोषिक वितरण समारंभाची सुरुवात प्रतिमापूजन व दीप प्रज्वलाने झाली. उपस्थित सर्व मान्यवरांचा महाविद्यालयाच्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मनोगत व्यक्त करताना जिल्हा परिषद सदस्य श्री. समीर सुपे यांनी विद्यार्थ्यांना 'जीवनात टिकायचे असेल तर संघर्ष करावा लागेल आणि त्यातून भवितव्य घडवावे लागेल' असे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मार्गदर्शनात मा. आमदार श्री. दिलीपराव दत्तात्रय मोहिते पाटील यांनी 'या महाविद्यालयाचा उद्देश स्पष्ट करून AI च्या युगात विद्यार्थी टिकला पाहिजे या महाविद्यालयाचा आदिवासी बांधवांनी योग्य लाभ घ्यावा व भविष्यात यशस्वी व्हावे' असे प्रतिपादन केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य, डॉ. किशोर भागवत यांनी केले वार्षिक अहवाल वाचन प्रा. सिलदार पावरा यांनी केला तर सूत्रसंचालन प्रा. महेश रानवडे यांनी केले आणि या कार्यक्रमाचे आभार प्रा. देवगडे मोहन यांनी मानले यानंतर विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम झाला यात सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता सर्वांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

## अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती भंडारा जिल्ह्या कार्यकारणी गठीत ; भंडारा जिल्हाध्यक्षपदी मदन बांडेबुचे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे :** अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीची जिल्हास्तरीय सभा अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे यांचे अध्यक्षतेखाली तर महाराष्ट्र संघटक हरिभाऊ पाथोडे , पूर्व विदर्भ प्रमुख सुनील आंडे, नागपूर जिल्हा अध्यक्ष वंजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न



झाली

सर्व संमतीने नवीन जिल्हा कार्यकारणी घोषित करण्यात आली त्यामध्ये जिल्हा संघटक म्हणून डी जी रंगारी ,जिल्हाध्यक्ष म्हणून मदन बांडेबूचे, जिल्हा सचिव मूलचंद कुकडे, कार्याध्यक्ष प्रा अशोक गायधने, जिल्हा उपाध्यक्ष ग्यानचंद जांभुळकर, रामभाऊ येवले ,कोषाध्यक्ष ए बी भोयर, युवा संपर्कप्रमुख पियुष ठवरे, महिला संपर्कप्रमुख प्रियाताई शहारे ,मीडिया प्रमुख विपीन पंचभाई तर कार्यकारणी सदस्य म्हणून रत्नाकर तिडके ,गोपाल शेलोकर, रमेश गोटेफोडे , कीर्ती गणवीर,हेमा गजभिये त्याचप्रमाणे जिल्ह्यातील तालुका संघटक म्हणून भंडारा प्रेमलाल लांजेवार, तुमसर राहुल डोंगरे ,लाखनी अशोक वैद्य, लाखांदूर सुनील बारसागडे, पवनी प्रकाश पचारे अशा पद्धतीने कार्यकारणी नवीन तयार करण्यात आली असून या कार्यकर्त्यांनी आपापले पदभार स्वीकारून चांगल्या पद्धतीचे काम करावे असे मत राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे व महाराष्ट्र संघटक हरिभाऊ पातोडे यांनी मत व्यक्त केले उपस्थित होते नवीन भंडारा जिल्हा कार्यकारणी ते पुणे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे

## स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी नानासाहेब इंदीसे यांना वाढदिवसानिमित्त दिल्या शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी आज एकतावादी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नानासाहेब इंदीसे यांची त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा भेट घेतली . त्यावेळी त्यांच्यासोबत रायगड जिल्हा कार्याध्यक्ष विजय धोत्रे व पेण तालुका अध्यक्ष अमित कांबळे उपस्थित होते ..त्यानंतर त्यांनी



पक्षाचे अध्यक्ष सागर भाई संसारे यांची भेट घेऊन आगामी 20 मार्च च्या क्रांती दिनाच्या कार्यक्रमाविषयी विचार विनिमय केला.फोटो : महेश साळुंखे यांनी नानासाहेब इंदीसे यांना वाढदिवसानिमित्त दिल्या शुभेच्छा

# बाबा सोनापीर उर्सांला सुरुवात

## हजारो भाविकांच्या उपस्थितीत पवित्र संदल संपन्न

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर /(प्रतिनिधी )सय्यद ईसा** : माहूर शहरातील सुफी संत बाबा सोनापीर दर्गाह येथे दरवर्षी मोठ्या भक्ती भावात साजरा होणाऱ्या उर्सांला दि 5 रोजी सुरुवात झाली असून दुपारनंतर परचम कुशाइ ध्वजारोहण झाल्यानंतर दर्गाह चे मुतवल्ली मुजावर शेख बाबर अहमद फकीर मोहम्मद यांचे सह सज्जादा नशीन साजिद ऊल्लाह जागीरदार यांचे सह हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत बाबा सोनापीर दर्गाह मधील पवित्र मजार वर संदल सह पवित्र चादर अर्पण करण्यात आली

दरवर्षी पाच दिवस चालणाऱ्या या उर्सात लाखो भाविक हजेरी लावतात पवित्र रमजान महिना असल्याने दररोज सायंकाळी सर्वधर्मीय भाविकांची प्रचंड गर्दी होते संदलच्या दिवशीही हजारो भाविकांनी संदल मध्ये सहभागी होऊन उर्सात आलेले आकाश पाळणे झुले लहान मुलांना खेळण्याच्या विविध कलाकृती सह शीत पेयाचे स्टॉल्स हॉटेल नाश्ता कपडे व इतर साहित्य मिळण्याचे स्टॉल्स लागल्याने आलेल्या भाविकासह नागरिकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी करत बालगोपाला सोबत आनंदोत्सव साजरा केला



पाच दिवस चालणाऱ्या या उर्सात कुठलीही आणि अनुचित घटना घडू नये म्हणून तहसीलदार अभिजीत जगताप उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे मुख्याधिकारी विवेक कांदे तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेश माचेवार वैद्यकीय अधीक्षक ओमप्रकाश साबळे मरावीचे अभियंता राहुल शेंडे नायब तहसीलदार कैलास जेठे नायब तहसीलदार अरुणाताई सूर्यवंशी सपोनी शरद घोडके पोउपनि संदीप अन्येबोईनवाड पोउपनी पालसिंग ब्राह्मण पोऊपनि बाबू जाधव यांचे सह पोलीस होमगार्ड कर्मचारी लक्ष देऊन असून व्यवस्थापन समितीचे मुतवली मुजावर बाबर अहमद फकीर मोहम्मद सज्जादानशीन साजिद उल्लाह जागीरदार तसेच आर्णी येथील अकबर भाई वसंत कपाटे विजय आमले अब्दुल जब्बार भाई इलियास बावाणी मनोज कीर्तने सय्यद झहीर भाई यांचे सह शहर परिसरातील मान्यवर मंडळी सहकार्य करीत आहे.

# धर्मांतर विरोधी कायद्यासाठी डॉ. संदीप धुर्वे यांचा यशस्वी लढा; राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय

## राज्य मंत्रिमंडळात कायदा मंजूर, लवकरच निघणार 'जीआर'!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** पालघर येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीचे (राष्ट्रीय जनजाती गौरव दिवस) औचित्य साधून आदिवासी अस्मितेसाठी आक्रमक आणि अभ्यासू पवित्रा घेणारे 'अखिल भारतीय जनजाती सुरक्षा मंच'चे केंद्रीय पदाधिकारी डॉ. संदीप धुर्वे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. महाराष्ट्रात बहुप्रतीक्षित 'धर्मांतर विरोधी कायदा' राज्य मंत्रिमंडळाने (कॅबिनेट) मंजूर केला असून, यासंदर्भात लवकरच शासन निर्णय (GR) निर्गमित करण्यात येणार आहे.

डॉ. संदीप धुर्वे यांची 'युनिक' मांडणी: "संस्कृती वाचली तरच समाज वाचेल"

मनोर येथे आयोजित ४ दिवसांच्या भव्य 'जनजाती कला महोत्सवात' डॉ. संदीप धुर्वे यांनी धर्मांतराचा मुद्दा अत्यंत तार्किक आणि प्रभावी पद्धतीने मांडला. त्यांनी स्पष्ट केले की, धर्मांतर हे केवळ




श्रद्धेचे परिवर्तन नसून ती आदिवासींच्या मूळ अस्तित्वावर केलेला घाला आहे.

"ज्या पद्धतीने निसर्गपूजक आदिवासींची संस्कृती आणि परंपरा पुसण्याचे प्रयत्न सुरू आहेत, त्याला रोखण्यासाठी केवळ भाषणे नकोत तर कडक कायद्याचे कवच हवे," अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली होती. त्यांच्या याच 'युनिक' मांडणीची दखल थेट राज्य प्रशासनाने घेतली आहे.

**संस्कृतीच्या रक्षणासाठी 'सुरक्षा कवच'**

डॉ. संदीप धुर्वे यांनी हा मुद्दा केवळ राजकीय न ठेवता तो आदिवासींच्या अस्तित्वाचा लढा बनवला. राज्य सरकारने या कायद्याच्या प्रक्रियेला आता अधिकृतपणे गती दिली आहे. या निर्णयामुळे:

छल-कपट आणि आमिषांना लगाम: प्रलोभन, फसवणूक किंवा भीती दाखवून होणाऱ्या धर्मांतरावर आता कडक कायदेशीर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे.

अस्मितेचे रक्षण: आदिवासी बांधवांच्या हजारो वर्षांच्या परंपरा, रूढी आणि मूळ ओळख टिकवण्यासाठी हा कायदा 'सुरक्षा कवच' ठरेल.

**देशभर 'डीलिस्टिंग' आणि धर्मांतर विरोधी लढ्याचा एल्गार**

डॉ. संदीप धुर्वे हे केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभर अखिल भारतीय जनजाती सुरक्षा मंचच्या माध्यमातून 'डीलिस्टिंग' (धर्मांतरित व्यक्तींना आरक्षणातून वगळणे) आणि धर्मांतर विरोधी कायद्यासाठी लढा देत आहेत. ज्या वेगाने ख्रिश्चन व इतर धर्मीयांकडून आदिवासींचे धर्मांतर केले जात आहे, ती बाब देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी आणि सांस्कृतिक अखंडतेसाठी चिंतेची असल्याचे त्यांनी सातत्याने केंद्र व राज्य सरकारकडे पुराव्यासह मांडले आहे.

या ऐतिहासिक निर्णयाबद्दल आनंद व्यक्त करताना डॉ. संदीप धुर्वे म्हणाले,"धर्मांतर विरोधी कायदा ही आदिवासी समाजाची ढाल आहे. भगवान बिरसा मुंडा यांनी ज्या जल, जंगल आणि जमिनीच्या अस्मितेसाठी लढा दिला, ती जपण्यासाठी हा कायदा मैलाचा दगड ठरेल. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी आमच्या या मागणीचा आदर केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे."

ऐतिहासिक यश: राज्य कॅबिनेटमध्ये धर्मांतर विरोधी कायद्याला मंजुरी मिळवून देण्यात डॉ. संदिप धुर्वे यांचा सिंहाचा वाटा.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे सिल्लोडमध्ये जल्लोषात आगमन रहीमाबाद येथील नियोजित स्मारकास शिवसैनिकांची पुष्पहार अर्पण करून मानवंदना

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :-** रहीमाबाद (ता. सिल्लोड) येथे नियोजित स्थळी उभारण्यात येत असलेल्या आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याचे आज सिल्लोड शहरात आगमन झाले. या निमित्ताने स्थानिक शिवसेना भवन व आमदार अब्दुल सत्तार यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर भव्य स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

सदर प्रसंगी उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ आणि जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित शिवभक्तांनी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून सोडला. रहीमाबाद येथे साकारले जाणारे हे स्मारक परिसरातील नागरिकांसाठी आणि युवा पिढीसाठी सदैव प्रेरणादायी ठरेल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी यावेळी व्यक्त केली.

या स्वागतपर कार्यक्रमास शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, नगरपालिकेतील शिवसेना गटनेते सुधाकर पाटील, प्रशांत क्षीरसागर, दत्ता शेजुळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयराम चिंचपुरे, संजय पाटील डमाळे, रहीमाबादचे सरपंच सुभाष नवल, हरिभाऊ चिंचपुरे, अनिल कुलकर्णी, भिकन राऊत, बबन बोडखे, बाबुराव बोडखे, माजी सरपंच विलास शिंदे, अंकुश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सोहळा अत्यंत शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

# अनुदानित शाळांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांची माहिती आता सार्वजनिक होणार

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका** : आज खाजगी अनुदानित शाळांमधील कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी आज महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालयाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आज या राज्यातील सर्व अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती आता 'शालार्थ' प्रणालीवर सार्वजनिक करण्यात येणार आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींनुसार हा निर्णयही घेण्यात आला असून, यामुळे शिक्षण क्षेत्रातील पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे.

**नेमकी काय माहिती उपलब्ध होणार?**

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर यांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, कर्मचाऱ्यांची खालील माहिती अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल:

आज या कर्मचाऱ्याचे नाव आणि पदनाम.

संस्थेचे व शाळेचे नाव.

सेवेत रुजू झाल्याचा दिनांक.

सेवानिवृत्तीचा महिना व वर्ष.

मिळणारे एकूण वेतन.

'शालार्थ' प्रणालीवर होणार प्रसिद्ध

ही सर्व माहिती https://shalarth.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. या प्रक्रियेसाठी आवश्यक तांत्रिक बदल करण्याचे निर्देश महाआयटीच्या बिझनेस अनालिस्टना देण्यात आले आहेत.

पारदर्शकतेसाठी उचललेले पाऊल

अनेकदा अनुदानित शाळांमधील पदभरती आणि वेतनाबाबत तक्रारी प्राप्त होत असतात.

ही माहिती सार्वजनिक झाल्यामुळे सामान्य नागरिकांना आणि संबंधित घटकांना एका क्लिकवर अधिकृत माहिती उपलब्ध होईल. शिक्षण विभागाने ४ मार्च २०२६ रोजी हे आदेश निर्गमित केले असून, याची अंमलबजावणी तातडीने करण्याचे निर्देश विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

# महागाव नगरपंचायतीत समित्यांची नवी 'टीम'; बांधकाम, आरोग्य, नियोजन व पाणीपुरवठा समितीचे सभापती ठरले

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव/यवतमाळ** : नगरपंचायतीच्या कामकाजाला अधिक गती देण्यासाठी महागाव नगरपंचायतीत विविध विषय समित्यांची स्थापना करण्यात आली असून संबंधित समित्यांच्या सभापतींचीही निवड जाहीर करण्यात आली आहे. बुधवार, दि. ५ मार्च २०२६ रोजी आयोजित विशेष सभेत ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

नगरपंचायत सभागृहात सकाळी ११ वाजता विशेष सभेला सुरुवात झाली. उमरखेड येथील उपविभागीय अधिकारी राम मुळे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली. सभेचे पहिले सत्र सकाळी पार पडले,तर दुपारी ३ वाजेपर्यंत पुढील सत्रात विविध विषय समित्यांच्या स्थापनेची व निवडीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.



या विशेष सभेत नगरपंचायतीच्या स्थायी समितीसह विविध विषय समित्यांची स्थापना,समित्यांची सदस्यसंख्या निश्चिती, सदस्यांची निवड तसेच सभापती व उपसभापती निवडीची प्रक्रिया पार पडली.दुपारच्या सत्रात विषय समित्यांच्या सभापती निवडीवर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले. ज्या समित्यांमध्ये नगरपंचायत उपाध्यक्ष पदसिद्ध सभापती असतात त्या समित्या वगळता इतर समित्यांच्या सभापतींची निवड संबंधित सदस्यांकडून करण्यात आली. सभापती व उपसभापती पदांसाठी नामनिर्देशन पत्रे दुपारी २ ते ३ या वेळेत स्वीकारण्यात आली.निवड प्रक्रियेनंतर बांधकाम समितीच्या सभापतीपदी विशाल पांडे,आरोग्य समितीच्या सभापतीपदी सुनीता डाखोरे, नियोजन समितीच्या सभापतीपदी प्रमोद उर्फ शाखा भरवाडे तर पाणीपुरवठा समितीच्या सभापतीपदी सुरेश नरवाडे यांची निवड जाहीर करण्यात आली. या प्रसंगी भाजपचे समन्वयक नितीन भुतडा, डॉ. इरफान कुंदन, नगरसेवक सुजित ठाकूर,गजानन साबळे, रामराव पाटील नरवाडे, फुलसावंगी मंडलअध्यक्ष योगेश वाजपेयी, नगरसेवक परवेज सुरैया,भाजपचे माजी तालुका अध्यक्ष दीपक आडे, भाजप शहराध्यक्ष निलेश नरवाडे, नगरसेविका जयश्री नरवाडे, आशा शंकर बावणे, सामाजिक कार्यकर्ते शिवाजी डाखोरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते.नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अजय कुरवाडे यांच्या उपस्थितीत सदर निवड प्रक्रिया पार पडली. विषय समित्यांची स्थापना झाल्यामुळे नगरपंचायतीच्या विविध विभागांशी संबंधित निर्णय प्रक्रिया अधिक सुसूत्र व गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून शहराच्या विकासकामांना त्यामुळे अधिक वेग मिळणार असल्याचे मानले जात आहे.

# श्रीवर्धनमध्ये शिवजयंती उत्साहात; भव्य रथोत्सव मिरवणुकीत शिवभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिथीनुसार साजऱ्या करण्यात आलेल्या जयंतीनिमित्त श्रीवर्धन शहरात भव्य रथोत्सव मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक पोशाखात आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषात निघालेल्या या मिरवणुकीला शिवभक्तांचा मोठा प्रतिसाद लाभला.मिरवणुकीची सुरुवात श्रीवर्धन दांडा येथील पांडुरंग चौले यांच्या निवासस्थानापासून झाली. तेथून चौकर पाखाडी, नारायण पाखाडी, सोमजाई मंदिर परिसर तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे बाजारपेठेतून मार्गक्रमण करत मिरवणूक पेशवे मंदिर येथे समाप्त झाली.मार्गातील विविध पाखाड्या आणि आळयांमध्ये नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून रथाचे स्वागत केले. वेशींवर लहान मुले, महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराजांना अभिवादन करत होते.या मिरवणुकीचे आयोजन शिवजयंती महोत्सव समिती, श्रीवर्धन



यांच्या वतीने करण्यात आले होते. श्रीवर्धन तालुक्यातील विविध गावांतील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण दिले.

# जागतिक महिला दिनानिमित्त रायगड जिल्हास्तरीय थर्टी प्लस करावली थ्रोबॉल अजिंक्यपद स्पर्धा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** जागतिक महिला दिनानिमित्त करावली स्पोर्ट्स अँड एज्युकेशन ट्रस्टच्यावतीने रविवार दिनांक ०८ मार्च रोजी खांदा कॉलनी येथे रायगड जिल्हास्तरीय थर्टी प्लस करावली थ्रोबॉल अजिंक्यपद स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.सीकेटी महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेचे उदघाटन पनवेल महानरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते होणार आहे. करावली स्पोर्ट्स अँड एज्युकेशन ट्रस्टच्या चेअरमन महाबला शेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आरती मलीक लॅबच्या व्यवस्थापकीय संचालिका डॉ. आरती मलिक, नगरसेविका कविता चौतमोल, कुसुम पाटील, सीता पाटील, अर्थतज्ज्ञ शलाका सोळसे, श्वेता शेट्टी उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेसाठी भारतीय जनता पार्टी पनवेल शहर मंडल, श्री खांदेश्वर अय्यप्पा भक्त वृंद, कर्नाटका संघ नवीन पनवेल आणि उडुपि श्रीकृष्णा भजन मंडळ खांदा कॉलनी यांचे सहकार्य लाभणार आहे.

# सर्वच तालुक्यात महाराजस्व शिबिरांचे होणार आयोजन – जिल्हाधिकारी डॉ .विपीन इटनकर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव नागपूर, :** राज्यभरातील सामान्य जनतेला शासकीय सेवांचा लाभ त्वरित मिळावा, यासाठी महसूल विभागाने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात मंडळ स्तरावर शिबिर आयोजित केले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन सभागृहात आज पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निवृत्ती राठोड, उपजिल्हाधिकारी सचिन गोसावी आदी यावेळी उपस्थित होते.

या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी ५ मार्चपर्यंत महसूल मंडळ स्तरावर पूर्वतयारी करण्यात आली आहे. नागरिकांचे अर्ज गोळा करणे आणि कागदपत्रांची पूर्तता करणे ही कामे या काळात पूर्ण केली गेली आहेत. जेणेकरून शिबिराच्या दिवशी प्रत्यक्ष लाभ देता येईल. हे अभियान तीन टप्प्यात राबवले जाणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

महसुल विभागाशी संबंधीत १५ महत्त्वाच्या सेवांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये दाखले, उतारे आणि इतर शासकीय योजनांच्या पायपीट थांबणार आहेत. तालुक्यातील दोन महसूल मंडळांसाठी ७ मार्च आणि १४ मार्च (शनिवार) रोजी शिबिरे होतील. तालुक्यातील दुसऱ्या दोन मंडळांसाठी १० एप्रिल आणि १७ एप्रिल रोजी आयोजन केले जाईल. नगरपालिका आणि नगरपंचायत स्तरावर ८ मे आणि १५ मे (शुक्रवार) रोजी दोन शिबिरे पार पडतील.अशा प्रकारे प्रत्येक तालुक्यात एकूण ६ शिबिरांच्या माध्यमातून महसूल प्रशासन जनतेच्या दारी पोहोचणार आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

समाधान शिबिरांतर्गत सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करून द्यावयाच्या सेवा



समाधान शिबिरा अंतर्गत सर्वसामान्य जनतेला विविध सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे यात प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे अभिलेख दुरुस्ती हेल्थ डेक्स लोकसेवा हक्क कायदा आकर्षक तरतुदी संदर्भातील सुधारणा बाबत मार्गदर्शन आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**मुलीसाठी 'एचपीव्ही'लसीकरण, ९ मार्चला जिल्ह्यात शुभारंभ**

गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग (सर्वाइकल कॅन्सर) रोखण्यासाठी १४ वर्ष पूर्ण ते १५ वर्षाआतील मुलींची एचपीव्ही लसीकरण मोहीम 9 मार्चपासून जिल्ह्यात सुरू करण्यात येणार आहे. ही लस एकाच डोसच्या स्वरूपात मोफत देण्यात येणार असून, या मोहिमेमुळे लाखो मुलींना भविष्यातील गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या धोक्यापासून संरक्षण मिळणार आहे. या लसीकरणासाठी पालकांची संमती बंधनकारक असणार असल्याचे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाले. ही लस अत्यंत सुरक्षित असून कुठलेही गैरसमज बाळगू नये असेही ते यावेळी म्हणाले.

# ग्रामीण रुग्णालय, मुदखेड येथे रुग्णांना निकृष्ट दर्जाचे अन्न; चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड | प्रतिनिधी योगेश चौदंते** : मुदखेड येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना दिल्या जाणाऱ्या अन्नाच्या दर्जाबाबत गंभीर तक्रार करण्यात आली असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शिवसेना राज्य ग्रंथालय सेल (वाचनकक्ष) विभागाचे जिल्हा सरचिटणीस बालाजी गडककर यांनी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना लेखी निवेदन सादर करून ग्रामीण रुग्णालयातील अन्नपुरवठ्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रत्यक्ष निवेदन देण्यात आले.

सादर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ग्रामीण रुग्णालयात दाखल रुग्णांना दिले जाणारे जेवण, नाश्ता व आहार अत्यंत निकृष्ट दर्जाचा असून त्यात आवश्यक पोषणमूल्यांचा अभाव आहे. शासनाकडून एका रुग्णाच्या जेवणासाठी दररोज सुमारे १४० रुपये मंजूर असताना प्रत्यक्षात दिल्या जाणाऱ्या अन्नाची गुणवत्ता अत्यंत खालावलेली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदारांनी रुग्णालयाला भेट देऊन अन्नव्यवस्थेची पाहणी केल्याचा दावा केला



असून संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हा प्रकार सुरू असल्याचेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

काही ठिकाणी संगनमताने गैरव्यवहार होत असल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून अन्नपुरवठा करणाऱ्या कंत्राटदारासह संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, तसेच रुग्णांना दर्जेदार व पोषक आहार उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांनी निवेदन स्वीकारून प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिल्याचे समजते.

या तक्रारीमुळे ग्रामीण रुग्णालयातील कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासन पुढे कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# कापूस वेचणी यंत्राद्वारे होणार

## कापूस वेचणी यंत्राचे प्रात्यक्षिक आयोजन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : २७ फेब्रुवारी रोजी कापूस वेचणी यंत्राचे प्रात्यक्षिक आयोजन करण्यात आले. कापूस वेचणी करिता असलेला मजुरांचा तुटवडा व वेचणी खर्च कमी करण्यासाठी यांत्रिक कापूस वेचणीचे प्रात्यक्षिक कॉनफेडरेशन ऑफ इंडियन टेक्स्टाईल इंडस्ट्री (CITI CDRA) द्वारे CICR व शक्तिमान ऍग्रो यांचे संयुक्तरीत्या CICR नागपूर येथे नुकतेच करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. जयंत मेश्राम वरिष्ठ शास्त्रज्ञ सीआयसीआर यांनी केले. डॉ.अर्जुन तायडे प्रमुख शास्त्रज्ञ यांनी कापूस वेचणी करिता मजुराची टंचाई व वेचनी करिता लागणारा साधारण १२ ते १५ रुपये प्रती किलो खर्च, यावर यांत्रिक वेचनि उपाय आहे. गोविंद वैराळे प्रकल्प समन्वयक (CITI CDRA), यांनी अतिघन कापूस लागवड पद्धतीमुळे कापसाचे उत्पादन वाढले आहे. यांत्रिक वेचनी



यंत्राचा अतिघन लागवडीसाठी उपयोग होईल. डॉ.विजय वाघमारे संचालक केंन्द्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर, यांनी शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा लाभघ्यावा, कापूस वेचणी यंत्राचा वापर करणे, हे शेतकऱ्याना, कापूस वेचणीसाठी पुढील काही काळात उपलब्ध होईल. कापूस संशोधन संस्था शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी, वेळोवेळी मार्गदशन करित आहे. डॉ. सीडी मायी माजी अध्यक्ष, कृषी शास्त्रज्ञ निवड मंडळ दिल्ली, यांनी सल्ला दिला की अधिक किमतीचे यंत्र लहान शेतकऱ्यांना खरेदी करणे आर्थिक दृष्ट्या परवडत नसल्याने शेतकऱ्यांनी त्यांच्या ग्रुपद्वारे, शेतकरी उत्पादक कंपनी करून त्याचा वापर करावा. डॉ.रामकृष्ण ज्येष्ठ वैज्ञानिक, डॉ.जयंत मेश्राम, डॉ.के. पांडीयन, डॉ.शैलेश गावंडे तसेच राशी सीडचे मयूर खेत्रे, शक्तिमान चे किशोर वाघ, डॉ.राव यांनी कापूस उत्पादन वाढीसाठी व तांत्रिक कापूस वेचणी बाबत मार्गदर्शन केले. कापूस संशोधन संस्था पांजरी नागपूर येथे, शक्तिमान कापूस वेचणी यंत्राद्वारे कापूस वेचणीचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. डॉ.एस के शुक्ला डायरेक्टर, सिरकोट मुंबई, यांनी स्वच्छ आणि नीरभेळ कापसाचे महत्त्व अधोरेखित केले, यंत्राद्वारे कापूस वेचल्यानंतर त्यामध्ये कचरा जास्त असतो त्यामुळे कचरा विरहित प्रक्रियेसाठी, अत्याधुनिक जिनिंग प्रेसिंग ची व्यवस्था आवश्यक आहे. डॉ.एस.व्ही.सरोदे माजी संचालक, डॉ.प.दे.कृ.वि.अकोला, यांनी वेचनीच्या खर्च शेतकऱ्यांना जास्त येतो मजूर मिळत नाही, वेचनीकरता मशीन शेतकऱ्यांना फायदेशीर ठरते असे प्रतिपादन केले. शक्तिमान चे कापूस वेचणी यंत्राद्वारे कापूस वेचणीचे सीआयसीआर चे फिल्ड मध्ये, कापूस वेचनीचे प्रात्यक्षिक करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. जयंत मेश्राम यांनी केले तर आभार डॉ. बाबासाहेब फंड, यांनी मानले.

या कार्याक्रमाच्यावेळी महादेव चंद्रभान गावंडे ता.पारशिवनी जि.नागपूर, उमेश अजाबराव वाघमारे ता. काटोल जि.नागपूर, ज्ञानेश्वर सोनटक्के मु. कवठा जि.नागपूर, दिलीप विश्वेश्वर ठाकरे ता. सेलू जि.वर्धा, खुशाल महादेव कानकाटे ता.हिंगणघाट जि.वर्धा या पाच प्रगतीशील शेतकऱ्यांना मानचिन्ह व श्रीफळ देवून गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास CITI CDRA नागपूर चे प्रकल्प अधिकारी युगांतर मेश्राम व वर्धा चे प्रकल्प अधिकारी अमित कवाडे आणि इतर कर्मचारी वर्ग व शेतकरी मोठ्या प्रमाणात प्रात्यक्षिक पाहण्यासाठी उपस्थित होते.

# मानोरा येथे जेष्ठ नागरिक आणि अपंग साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न

## खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या हस्ते साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**

**मानोरा तालुका प्रतिनिधी/नितीन आढाव** : तालुक्यात नोंदणी केलेल्या दिव्यांग बंधू भगिनी तसेच 60 वर्षा वरील जेष्ठ नागरिक यांना सहायभूत साधनाचे ADIP(अपंग व्यक्तींना सहाय्यक उपकरणे) आणि RVV(राष्ट्रीय वयोश्री योजना) अंतर्गत साहित्य वाटप झाले आहे माननीय खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उदघाटन आणि साहित्य वाटप झाले आहे. मागील वर्षी दिव्यांग बांधवांची नोंदणी करण्यात आली होती तरी आता सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, कानपूर व मुंबई जिल्हा प्रशासन – यवतमाळ व वाशिम



यांच्या वतीने साहित्य वाटप झाले आहे तरी त्या मध्ये व्हील चेअर,श्रवणयंत्र, काठी,वॉकर,ट्रायसायकल आदि साहित्य वितरण होणार झाले आहे या मध्ये जेष्ठ नागरिक 162 तर दिव्यांग 16 असे एकूण 178 पुरुष आणि महिला यांनी लाभ घेतला आहे तसेच खासदार संजय भाऊ देशमुख यांचा सत्कार पंचायत समिती गटविकास अधिकारी जाधव यांनी केला या वेळी उपस्थित रवी पवार तालुका प्रमुख शिवसेना(उबाठा),विजय अनंतकुमार पाटील माजी सदस्त पंचायत समिती,प्रकाश राठोड माजी अध्यक्ष तांडा सुधार वस्ती वाशीम,प्रा. राजेंद्र पाटील म्हातारमारे नगरसेवक नगर पंचायत मानोरा,डॉ. विठ्ठल घाडगे,ओंकार राठोड, महेश पाटील,माजी उपसभापती पंचायत समिती मानोरा, संतोष पुरी शहर प्रमुख शिवसेना(उबाठा),नितीन खुपसे, शिवा अंधारे युवासेना तालुका प्रमुख, देवा कुऱ्हाडे युवासेना उपतालुका प्रमुख मानोरा, नितीन पाटील युवासेना उपजिल्हा प्रमुख कारंजा-मानोरा, गोपाल गावंडे हवामान् तज्ञ आणि इतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते..

# विज्ञानाच्या पलीकडे फक्त आणि फक्त विज्ञानच असते

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया/ भंडारा प्रतिनिधी** : विज्ञानाच्या पलीकडे फक्त आणि फक्त विज्ञानच असते बाकी कुठलेही भूत भानामती लावडीन चेटकिन मंत्र तंत्र जादूटोणा फोकनाड अध्यात्म त्याच्यामागे दडलेले नसते असे प्रतिपादन ग्यानचंद ताराचंद जांभुळकर यांनी दि. 28 फेब्रुवारी ला राष्ट्रीय विज्ञान दिन या कार्यक्रमांत समर्थ विद्यालय लाखनी येथे बोलताना केले. या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी प्राचार्य विभावरी निखाडे होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणून सेवानिवृत्त तहसीलदार राजेश मडामे व लीचडे सर तसेच प्रा. सतीश भोवते हे सुद्धा उपस्थित होते.

जांभुळकर पुढे बोलताना म्हणाले की विद्यार्थ्यांनो बुवाबाजीच्या फंदात पडू नका फसवणारे लोक या जगामध्ये खूप आहेत तुम्ही विज्ञान युगामध्ये जगता तुम्हाला चिकित्सक बनले पाहिजे. आपल्याला फसवणारे लोक खूप आहेत त्यांची चालाकी आपण ओळखले पाहिजे. विज्ञानाने आपले जीवन समृद्ध केलेले आहे




शोध वृत्ती आपल्या मनामध्ये असावी अपयशाने खचून जाऊ नये थॉमस अलवा एडिसिन यांनी 1032 वेळा बल्बचा शोध लावण्यासाठी प्रयत्न केले. परंतु तो पूर्णपणे सफल झाला नाही तेव्हा त्याला मदत करणारे त्यांचे मित्र त्याला सोडून गेले आम्हाला तुझ्यासोबत काम करण्याची इच्छा नाही एवढे प्रयत्न करून आम्हाला काहीही मिळाले नाही तेव्हा मित्रांनो एडिसन यांचे उत्तर सामाजिक व मानव कल्याणासाठी काय होते,? एडिसन मनाला आपण १०३२ मार्ग शोधून काढलेले आहेत .या जगामध्ये जो कोणी बल्बचा शोध लावण्यासाठी या प्रकारचा प्रयत्न करेल तर त्यांना आपण सांगू की आम्ही या मार्गाने पहिल्यांदाच गेलेले आहोत तुम्ही या मार्गाने जाऊन आपला पैसा वेळ श्रम वाया घालवू नका. दुसरं काहीतरी करा एवढे मानव कल्याणाचे विचार एडिसन यांच्यामध्ये होते पण शेवटी 103३ नंतर त्यांना बल्बचा शोध लागला हे मानव जातीचे कल्याण आहे .मित्रांनो म्हणून विज्ञानाच्या पलीकडे विज्ञानाच असते.

विज्ञानाच्या पलीकडे विज्ञान असते हे पटवून देण्यासाठी जांभूळकर यांनी विद्यार्थ्यांना काही वैज्ञानिक प्रयोग करून दिले जसे हातावर कापूर जाळणे व ते जिभेवर घेणे, लिंबू मधून वस्तू काढणे ,लिंबू मधून रक्त काढणे, तांदळाने भरलेला लोटा पॅचकसने उचलणे, चिठ्ठी मधील नावे ओळखणे कानाला लावून, रुमालेची गाठ सोडणे, जिभेला स्पोक टोचणे ,नारळातून वस्तू काढणे, इत्यादी प्रयोग करून अंधश्रधा बाळगू नका असे सांगीतले .विद्यार्थ्यांनी या सुंदर कार्यक्रमास प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन वर्ग ११ वी विज्ञान ची विद्यार्थिनी कु तनवी बडवाईक नी केले कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# सावधान! कर्ज फेडले तरी छळ थांबेना

## घाटंजीच्या तरुणाला अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी /महेश पेन्दोर** : मोबाईलवरील 'लोन ॲप' (कर्ज देणारे ॲप) किती धोकादायक ठरू शकतात, याचा एक धक्कादायक प्रकार घाटंजीमध्ये समोर आला आहे. घेतलेले कर्ज व्याजासह पूर्ण परत करूनही, एका तरुणाला आणि त्याच्या कुटुंबाला अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल केले जात आहे.

**काय आहे नेमकी घटना?**

घाटंजी येथील रहिवासी नीरज मन्ने यांनी २६ फेब्रुवारी रोजी एका मोबाईल ॲपवरून कर्ज घेतले होते. हे कर्ज त्यांनी ३ मार्च रोजी पूर्णपणे फेडले. मात्र, कर्ज फेडल्यानंतरही त्यांचा छळ थांबलेला नाही.

**अशा प्रकारे दिला जातोय त्रास:**

परदेशी नंबरवरून धमक्या: गेल्या दोन दिवसांपासून नीरज यांना पाकिस्तान (+९२), इंग्लंड (+४४) अशा विविध देशांच्या नंबरवरून व्हॉट्सॲप कॉल येत आहेत.

फोटोशी छेडछाड: "पैसे दिले नाहीत, तर तुझे आणि तुझ्या घरातील महिलांचे फोटो खराब (एडिट) करून तुझ्या नातेवाईकांना पाठवू," अशी धमकी हे लोक देत आहेत.

संपर्क क्रमांक हॅक: या टोळीने नीरज यांचा मोबाईल डेटा हॅक केला असून, त्यांच्या फोनमधील सर्व नातेवाईकांचे नंबर चोरले आहेत. हे फोटो सर्वांना पाठवण्याची भीती दाखवून ते पुन्हा पैशांची मागणी करत आहेत.

**सायबर पोलिसांत धाव:**

या सततच्या त्रासामुळे नीरज मन्ने आणि त्यांचे कुटुंब प्रचंड मानसिक दडपणाखाली आहे. अखेर त्यांनी यवतमाळ सायबर सेल आणि घाटंजी पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार देऊन कारवाईची मागणी केली आहे.

**लोकांसाठी महत्त्वाची टीप:** कोणत्याही अनोळखी मोबाईल ॲपवरून कर्ज घेऊ नका. हे ॲप्स कर्ज देताना तुमच्या फोनमधील फोटो आणि नंबर चोरतात आणि नंतर ब्लॅकमेल करतात. अशी फसवणूक झाल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा.

# प्राचार्य श्री आर डी गावित साहेब विद्यालयाचे बेस्ट टीम लीडर

**दैनिक युवक आधार**

**खालापूर संतोष शेवाळे** : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर चे संस्थापक शिक्षण महर्षी डॉक्टर बापूजी साळुंखे यांच्या आशीर्वादाने व संस्थेचे कार्याध्यक्ष श्री अभय कुमारजी साळुंखे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली त्याचबरोबर संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री कौस्तुभजी गावडे साहेब शाळा सल्लगार समिती अध्यक्ष श्री विजय (भाऊ) पाटील व सर्व सल्लागार समिती सदस्य यांच्या सल्ल्याने प्राचार्य श्री आर डी गावित साहेब हे कार्यक्षमपणे काम करीत आहेत.कोणत्याही विद्यालयाचे संस्थेचे यश हे केवळ तिथल्या इमारतीवर अवलंबून नसते, तर त्या विद्यालयाला दिशा देणाऱ्या नेतृत्वावर अवलंबून असते. आपल्या विद्यालयाचे प्राचार्य श्री आर डी गावित हे असेच एक व्यक्तिमत्व आहेत, ज्यांनी आपल्या कल्पकतेने आणि शिस्तीने या विद्यालयाला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवले आहे.

प्राचार्यांची सर्वात मोठी ओळख म्हणजे त्यांची वेळेची शिस्त. 'शब्दापेक्षा कृती मोठी' या उक्तीप्रमाणे ते स्वतः नेहमी वेळेवर उपस्थित राहून शिक्षक आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा देतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयात केवळ अभ्यासाचेच नव्हे, तर सुसंस्कारांचेही वातावरण निर्माण झाले आहे.



**विद्यार्थीभिमुख दृष्टिकोन**

एक कठोर प्रशासक असूनही त्यांच्या मनात विद्यार्थ्यांबद्दल अपार आपुलकी आहे. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांच्या कलागुणांना वाव देणे आणि त्यांना भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे, हा त्यांचा मुख्य ध्यास असतो. त्यांच्या कार्यालयाचे दरवाजे नेहमीच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी उघडे असतात.

गेल्या काही वर्षांत विद्यालयाने शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात जे यश संपादन केले आहे, त्यामागे प्राचार्य श्री गावित साहेब यांचे नियोजन आणि दूरदृष्टी आहे. नवनवीन उपक्रम राबवणे, तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे आणि शिक्षकांना नवनवीन प्रयोग करण्यास प्रोत्साहन देणे यामुळे आपल्या शाळेचा नावलौकिक सर्वदूर पसरला आहे.

"एक चांगला शिक्षक हा मेणबत्ती सारखा असतो. जो स्वतः जळून इतरांना प्रकाश देतो. प्राचार्यांच्या बाबतीत हे विधान तंतोतंत खरे ठरते".

प्राचार्य श्री आर डी गावित साहेब हे केवळ आमचे प्रमुख नसून ते आमचे मित्र, तत्वज्ञ आणि मार्गदर्शक आहेत. त्यांच्या या निस्वार्थ सेवेबद्दल आणि कौतुकास्पद कामगिरीबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो, हीच सदिच्छा!

# सावळेश्वर ट्रॅक्टर्सची वर्षभरात यशस्वी वाटचाल दुसऱ्या वर्षात पदार्पण केक कापून आनंदोत्सव साजरा

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे** : शून्यातून विश्व निर्माण करून उद्योग जगतामध्ये गगन भरारी घेत शेकडो नागरिकांच्या हाताला काम मिळवून देणारे,स्वकर्तत्वावर आपले वेगळे स्थान निर्माण करणारे उद्योजक आयडॉल असणारे रमेश दादा आजबे पाटील यांच्या सावळेश्वर उद्योग समूहाचे आष्टी शहरातील सावळेश्वर ट्रॅक्टर्स या स्वराज कंपनीच्या भव्य ट्रॅक्टरचा शुभारंभ मागील वर्षी शिवजयंतीच्या शुभ मुहूर्तावर करण्यात आला होता. विशेष आकर्षक ग्राहकांना सवलत व तत्पर सेवा दिल्याने आष्टी तालुक्यात स्वराज ट्रॅक्टर ला मोठी मागणी वाढली अन जिकडे-तिकडे स्वराज ट्रॅक्टरच ग्राहकांनी खरेदी करण्यास पसंती दिल्याने सावळेश्वर ट्रॅक्टरने कंपनीने ठरवून दिलेल्या टार्गेटचा टप्पा ओलांडून दुप्पट ट्रॅक्टरचे विक्रमी विक्री करून गावागावात शोरूमचे व कंपनीचे नाव पोहोचले आहे. ग्राहक राजांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल सावळेश्वर ट्रॅक्टर चे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी ग्राहकांचे आभार मानले पहिल्या वर्धापन दिन मेहनत घेणाऱ्या सर्व स्टाफ कर्मचाऱ्यांसोबत केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

सावळेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या जिवनामध्ये परिवर्तन घडवून आणणे आणि त्यांचे जिवन समृद्ध करणे या उद्देशाने प्रेरित होऊन ट्रॅक्टर उद्योग जगतात २०१६ पासून पाऊल ठेवले त्यांनी आष्टी शहरात मागिल वर्षी १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती च्या शुभमुहूर्तावर सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नावाने स्वराज ट्रॅक्टर चे नवीन ट्रॅक्टर




शोरुमचा भव्य शुभारंभ संपन्न झाला. अनेक ट्रॅक्टरच्या विविध कंपन्या असून वार्षिक ट्रॅक्टर विक्री करण्यासाठी डीलरला टारगेट दिले जाते. हे टारगेट पूर्ण नाही झाले तर काही कंपन्या डीलर कडून डीलरशिप देखील काढून घेतात असे प्रसंग अनेक वेळा पाहायला मिळतात परंतु याला अपवाद आहे.ते म्हणजे सावळेश्वर ट्रॅक्टर वर्षभर भव्य बंफर ऑफर ठेवल्याने तात्काळ बुकींग करणा-यास सवलत देण्यात आल्याने अवघ्या १ वर्षात ४४४ स्वराज ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री झाली आहे.दणगट व कमी खर्चात ज्यादा काम करणाऱ्या स्वराज ट्रॅक्टने आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना भुरळ घातली आहे.हा विक्रमी सेलचा टप्पा ओलांडण्यासाठी संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे यांच्या सह स्टेट हेड गुप्ता साहेब, एरिया मॅनेजर गिरीश जाधव, टेरेटरी मॅनेजर चेतन मुंडे साहेब,ब्रांच मॅनेजर मुळे साहेब,मॅनेजर प्रकाश कदम, मॅनेजर राजू साबळे,अकाउंट प्रांजली उगले,सुजाता सायकड,आशा पवार, रिसेप्शन रेणुका वैद्य, जयश्री सांगळे, लखन आजबे,आकाश शेळके,जालिंदर भवर, सागर निकरड,श्रीकांत गोले, ऋषी गायकवाड,रणजीत मुंडे, नामदेव आजबे,रवींद्र खंडागळे,ओमकार सोले, अशोक खंडागळे,धीरज रोडे,सुरज गोलेकर,स्वप्निल बरकडे,नामदेव हराळ,इब्राहिम पठाण, हनुमान घरगीणे, विश्वकर्मा कुमार,पुजा साठे,आदींच्या अथक परिश्रमाने ग्राहकांना जलद सेवा दिल्याने ट्रॅक्टरचा विक्रमी विक्रीचा टप्पा पार केला आहे.

**तुमच्या सहकार्यानेच आम्ही हे यश मिळवू शकलो आहोत.**

**आमच्या शोरुमच्या वर्धापनदिनानिमित्त सर्व प्रिय ग्राहक आणि हितचिंतकांचे मनापासून आभार! तुमचा अमूल्य विश्वास आणि पाठिंबा हाच आमच्या यशाचा आधार आहे. गेल्या वर्षांपासून तुमच्या सेवेसाठी तत्पर राहून, तुमच्या सहकार्यानेच आम्ही हे यश मिळवू शकलो आहोत. भविष्यातही उच्च दर्जाची तत्पर सेवा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

**- रमेश दादा आजबे (सावळेश्वर ट्रॅक्टर्स धोंडे पेट्रोल पंपा समोर नगर रोड आष्टी )**

# कानपोली येथे तहसीलदारांच्या उपस्थितीत चावडी बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत कानपोली येथील राम मंदिर ( चावडीचे ठिकाण) येथे 5 मार्च रोजी तहसीलदार मिनल भामरे-भोसले यांची ' चावडी बैठक आयोजित करण्यात आली होती. नायब तहसीलदार राजश्री जोगी, मंडळ अधिकारी बापू सरगर व मंडळ तळोजेमधील सर्व ग्राम महसूल अधिकारी तसेच कानपोली गावचे सरपंच मदन मते व उपसरपंच रामचंद्र पाटील याच्या समवेत कानपोली गावचे ग्रामस्थ यांची एकत्रित बैठक रात्री ८.१५ वाजता सुरू झाली. यावेळी उपस्थित सर्व ग्रामस्थ यांचे प्रश्न ऐकून जाणून घेऊन त्यावर मार्गदर्शन केले. तसेच अभियानातील सर्व महसूल विभागाच्या सेवा जसे डिजिटल सातबारा वाटप, विविध प्रकारचे दाखले, जिवंत सातबार मोहिमेतील वारस नोंदी, निराधार लोकांशी संबधित योजनांशी संबधित लाभ, सातबारा सबंधित सुधारणा इत्यादी अशा एकूण १५ सेवाबद्दल इतंभूत माहिती त्याना दिली. 'चावडी बैठक 'ही तशी पूर्वीपासून चालत आलेली संकल्पना या निमित्ताने पुन्हा एकदा ग्रामस्थाच्या वेळेनुसार नियोजित करून



नाविन्यपूर्ण म्हणून अमलात आली. साधारणत: नियमित शासकीय वेळेत रोजगार संबधित कामात ग्रामस्थ व्यस्त असल्याने सर्वसमावेशक बैठक घेऊन सर्वापर्यंत पोहचणे शक्य होत नाही. त्यामुळे साधारणत: रात्रीच्या वेळेत नियोजित केलेल्या या सभेत तहसिलदार मिनल भामरे -भोसले यांचे पूर्ण मार्गदर्शन लोकाना लाभले. तसेच या बैठकीत गावातील स्त्रिया, पुरुष, तरुण मुले व वृध्द यांचा एकत्रित सहभाग दिसून आला व जास्तीत जास्त लोकाना सुद्धा त्यांच्या समस्या, अडीअडचणी महसूल विभागातील अधिकाऱ्यांपर्यंत थेट चर्चा करून मांडता आल्या.

तहसीलदार मिनल भामरे भोसले यांनी लोकांच्या समस्या जाणून घेऊन अभियानातील सेवेतून त्यावर कसा मार्ग काढता येईल यावर ग्रामस्थाना मार्गदर्शन केले. व महसूल विभागाशी संबधित सर्व सेवांची इतंभूत माहिती सर्वांना सांगितली.

# महाराष्ट्र राज्याचा महसूल विभाग घेऊन येत आहे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

**दैनिक युवक आधार**

**खालापूर -संतोष शेवाळे :** स्वराज्याचा ध्यास लोक कल्याणाचा संकल्प हिंदवी स्वराज्याचे प्रणिते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेने राज्याचा महसूल विभाग घेऊन येत आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान पुढील 3 महिन्यात दिनांक 7 मार्च, 14 मार्च, 10 एप्रिल, 17 एप्रिल, 8 मे, 15 मे, या दिवशी सर्व मंडळ, नगरपालिका, नगरपंच्यायतीच्या क्षेत्रात 6 विशेष अभियान दिवस आयोजित करण्यात येणार आहे. सर्व सामान्य जनता, शेतकरी, शेतमजूर, विध्यार्थी, महिलांसाठी महसूल विभागाच्या 15 सेवा देण्यात येणार आहे.

माणसाच्या जन्मापासून मृत्यू पर्यंत, अपंगापासून अनाथा पर्यंत, विधवेपासून वृद्ध पर्यंत, आणि शेतकऱ्यापासून उद्योगपती पर्यंत महसूल विभागाचा पालक विभाग म्हणून संबंध येतो. कामाची आणि नियमांची प्रचंड व्याप्ती




यामुळे नागरिकांना बऱ्याच वेळा मर्यादित कालावधीमध्ये सोयी सुविधा उपलब्ध करून देता येत नाहीत किंवा त्यांची कामे होत नाहीत हे लक्षात घेता.

महाराष्ट्र शासन आणि राज्याचे माननीय महसूल मंत्री ना. श्री. बावन कुळे साहेब यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान येत्या 3 महिन्यामध्ये सर्व तालुका स्तरांवर राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये मंडळ स्तरावर शिबीरे घेऊन शासनाने आतापर्यंत जनतेच्या सुविधेसाठी जे शासन निर्णय आणले याचा प्रसार आणि प्रसिद्धी त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांना, महिलांना, शेतकऱ्यांना, नागरिकांना 7/12 दाखले आणि इतर सुविधा त्यांच्या द्वारी, त्यांच्या गावात उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने पुढील 3 महिन्यामध्ये ग्रामस्तरीय पदाधिकारी आणि अधिकारी यांचा समन्वयं राहावा याकरिता सरपंच परिषेत पंचायत समिती खालापूर येथे आयोजित करण्यात आली होती त्याकरिता तालुक्यातील सर्व सन्माननीय पदाधिकारी, सरपंच, मंडळ अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्राममहसूल अधिकारी आणि इतर विभागाचे अधिकारी व कर्मचारी हजर होते. सदर अभियान हे दिनांक 18-2-2026 ते 5-3-2026 पर्यंत मंडळ स्तरावरती पूर्व तयारी करणे व दिनांक 7-3-2026 ते दिनांक 15-5-2026 दरम्यान मंडळ स्तरावरती शहरी व ग्रामीण भागात शिबिराचे आयोजन करणे त्याकरिता मंडळ स्तरावर खालापूर तालुक्यात सात शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले आहेत. खालापूर, खोपोली, वासंबे, चौक, वावोशी, खालापूर, खोपोली सदर या सात शिबिरात महसूल विभागाच्या 15 सेवा देण्यात येणार आहेत. तसेच शासन निर्णयामधील राबवयाच्या योजनाबाबत सर्व स्थानिक लोक प्रतिनिधी यांच्याशी विचार विनिमय करून सदर सेवा व दाखले देण्याबाबत कारवाई करण्यात यावी. तरी जास्तीत जास्त शहरी व ग्रामपातळीवरील विध्यार्थी व जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार खालापूर श्री अभय चव्हाण यांनी केले आहे.


# गावात दारूच्या नशेत धिंगाणा; आदिवासी समाजातील कुटुंबावर जीवघेणा हल्ला!

## महिलेच्या हातावर काठीचे वार, चिमुकली जखमी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक प्रकार समोर आला असून दारूच्या नशेत आलेल्या व्यक्तीने आदिवासी कुटुंबावर काठीने हल्ला केल्याची गंभीर तक्रार नोंदविण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

तक्रारदार सौ. नंदाबाई काशीनाथ लठाड (वय २८, रा. जनुना सोनखेड, ता. जि. वाशिम) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, गावातील रंजित भीमराव राठोड हा दारू पिऊन त्यांच्या घरासमोर आला. कोणतीही कारण नसताना त्याने शिवीगाळ सुरू केली. तक्रारदार बाहेर येऊन विचारणा करताच आरोपीने हातातील काठीने त्यांच्या उजव्या हातावर जोरदार वार करून जखमी केले. इतक्यावरच न थांबता आरोपीने तक्रारदाराच्या सासऱ्यांवरही काठीने हल्ला केला. या गोंधळात तक्रारदाराच्या लहान मुलीच्या नाकाला काठी लागून तीही जखमी झाली. घटनेदरम्यान आरोपीने



जातीवाचक अपशब्द वापरत अश्लील भाषेत शिवीगाळ केली आणि "जिवे मारून टाकीन" अशी उघड धमकी दिल्याचा आरोप आहे.या प्रकारानंतर आरोपीच्या नातेवाईकांनी त्याला तेथून दूर नेले. मात्र, या घटनेमुळे आदिवासी समाजात तीव्र नाराजी पसरली आहे. समाजाच्या भावना दुखावल्या गेल्याने आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी होत आहे.तक्रारदार महिलेने वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात जाऊन जबानी रिपोर्ट दिला असून भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनच्या दबंग ठाणेदार आदरणीय श्रीदेवी पाटील यांनी या प्रकरणाची

**"विनाकारण आमच्या कुटुंबावर हल्ला करण्यात आला. माझ्या चिमुकलीलाही इजा झाली. आम्हाला कायद्यावर विश्वास असून न्याय मिळावा हीच अपेक्षा आहे."**

**– सौ.नंदाबाई काशीनाथ लठाड**

**"महिलांवरील अत्याचार, जातीवाचक वक्तव्ये आणि कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. कोणालाही कायदा मोडण्याची मुभा दिली जाणार नाही."**

**ठाणेदार, श्रीदेवी पाटील वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशन**

गंभीर दखल घेत तात्काळ कारवाईचे आदेश दिले असून परिसरात शांतता राखण्यासाठी विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**परिसरात तणावाचे वातावरण**

या घटनेनंतर गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी लक्ष ठेवले आहे. संबंधित आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पीडित कुटुंबीयांनी केली आहे.

# पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे आजपासून 'अहवाल बंद' असहकार आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्यातील पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रशासकीय अटी आणि वाढत्या कामाच्या ताणामुळे आक्रमक पवित्रा घेतला आहे. महाराष्ट्र राजपत्रित पशुवैद्यक संघटनेच्या वतीने आज, शनिवार (दि. ७ मार्च) पासून राज्यातील सर्व प्रकारचे प्रशासकीय अहवाल देणे बंद करून 'असहकार आंदोलन' सुरू करण्यात येत आहे.

कोरोना संकट, लंपी त्वचा रोग आणि दूध अनुदान योजना अशा कठीण काळात अहोरात्र सेवा देऊनही अधिकारी सध्या त्रस्त आहेत. तांत्रिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून अतांत्रिक (कारकुनी) कामे करून घेणे, रिक्त पदांमुळे कामाचा अतिरिक्त ताण, सक्तीची ऑनलाइन उपस्थिती आणि अपुऱ्या सुविधांमुळे निर्माण झालेली कोंडी, या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे पाऊल





उचलण्यात आले आहे.

शुक्रवारी संघटनेच्या शिष्टमंडळाने छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त श्री. पापळकर, जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जी.प.) तसेच पशुसंवर्धन विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त व जिल्हा उपायुक्त यांना प्रत्यक्ष भेटून मागण्यांचे निवेदन दिले.

यावेळी सचिव डॉ. संदीप राठोड, डॉ. महेश पवार, डॉ. भारत दिगुळे, डॉ. दत्ता गांधले, डॉ. अभिषेक खडसे, डॉ. नितीन चव्हाण, डॉ. महेश तळेकर, डॉ. रमण इंगळे, डॉ. असरार अहमद, डॉ. ज्योत्स्ना भगत, स्मिता बायस, डॉ. रोहिणी साळवे, स्मिता इंगळे, डॉ. राजेंद्र अश्विनी यांसह संघटनेचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पशुवैद्यकीय सेवा सुरूच राहणार**

**"आमचे हे आंदोलन केवळ प्रशासकीय कामकाजाच्या विरोधात आहे. आम्ही कोणत्याही पशुपालकाला किंवा मुक्या जनावरांना वेठीस धरणार नाही. औषधोपचार आणि अत्यावश्यक सेवा नियमित सुरू राहतील. मात्र, शासनाने आमच्या मागण्यांची दखल न घेतल्यास नाईलाजास्तव आम्हाला सामूहिक राजीनामे देऊन साखळी उपोषण करावे लागेल."**

**- डॉ. विनोद विलासराव चव्हाण, (जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राजपत्रित पशुवैद्यक संघटना)**

# राजहंस वाढे सर महाराष्ट्र राज्य सिनियर पोलीस मित्र आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटन मध्ये माननीय प्रियांका मॅडम यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**उल्हासनगर/रशीद शेख :** पोलीस मित्र आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेमध्ये यांची कुर्ला जिल्हा अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे प्रियांका मॅडम यांची सामाजिक सेवा क्षेत्रात फार मोठा दबदबा आहे राजहंस वाढे सर यांची पोलीस मित्र आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेमध्ये आगदी डोळयात तेल घालून संघटना वाढवत आहेत आज ते सर्व महाराष्ट्र भर फीरत आहे ज्यांना जिल्हेची जबाबदारी देण्यात आली आहे ते सुद्धा येवढे फीरत नाही आणि सदस्य पण वाढवत नाही वाढे सर यांचा सामाजिक क्षेत्रात

मध्य त्यांचे नाव आजवर त्यांनी गोरं गरिबांच्या मुली मुलांसाठी मदतीचा हात देतात मगं कोणाचें लग्न असो की शालीय साहित्य असो आपलीं समाज सेवा ते स्वतःच्या पैशाने करतात कुणाचे हि एक रुपया न घेता आपलीं सेवा ते प्रमाणिक पणाने बजावता वाढे सर यांचा स्वभाव मनी माऊ जसा आहे पुढील पोलिस मित्र संघटना वाढीसाठी प्रियांका मॅडम यांनी सांगितले की महाराष्ट्र राज्य सिनियर पोलीस मित्र आंतरराष्ट्रीय मानवाधिकार



संघटनेचे अध्यक्ष वाढे सर यांच्या मार्गदर्शनाखाली मी पोलीस मित्र सदस्य जोडण्याचे काम करीत राहिल आसेचे माझ्या हातातुन संघटना वाढीसाठी चांगले काम करण्याची संधी मिळो हीच ईश्वरचरणी मी प्रार्थना करते

# 'हरितवारी'तून जपला तुकोबांचा आध्यात्मिक वारसा; छत्रपती संभाजीनगर अन् जालना जिल्ह्यात 'नांद्रुक' वृक्षाचे रोपण

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असा अजरामर संदेश जगाला देणारे जगद्गुरु संत तुकाराम महाराज हे जगातील श्रेष्ठ पर्यावरणवादी संत मानले जातात. तुकोबांच्या ज्या देहू नगरीत नांद्रुक वृक्षाच्या सानिध्यात अभंग गाथा रचली गेली आणि ज्या वृक्षावरून त्यांनी वैकुंठगमन केले, तोच आध्यात्मिक आणि पर्यावरणाचा वारसा आता 'हरितवारी' उपक्रमाच्या माध्यमातून मराठवाड्यात रुजला आहे. तुकाराम बीज सोहळ्याचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातील १० विविध ठिकाणी पवित्र 'नांद्रुक' वृक्षाचे काष्ठ-रोपण करण्यात आले.

पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांनी गेल्या चार वर्षांपासून 'हरितवारी' ही अभिनव मोहीम हाती घेतली आहे. अध्यात्म आणि विज्ञानाचा मेळ घालत त्यांनी राज्यभर नांद्रुक



वृक्षाचा शास्त्रीय अभ्यास करून शेकडो रोपे लावली आहेत. देहू येथील इंद्रायणी काठी असलेला सुमारे ६०० वर्षे जुना नांद्रुक वृक्ष हा भाविकांसाठी श्रद्धेचे स्थान आहे. तुकाराम बीजेच्या दिवशी दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी या वृक्षाची पाने दैवी ऊर्जेने सळसळतात, असा भाविकांचा अनुभव आहे. हाच वारसा जपत डॉ. पाटील यांनी तालुक्यातील आमसरी, रहीमाबाद यांसारख्या भागात वन्य अवस्थेत आढळणाऱ्या या वृक्षाची शास्त्रीय नोंद 'पी.बी.आर.' (People's Biodiversity Register) मध्ये केली असून, आता त्याचे रोपण ठिकठिकाणी केले जात आहे.

कुंभारी (ता. भोकरदन) येथे प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. संतोष महाराज आढावणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा वृक्ष लावून त्याचे संवर्धन केले जात आहे. "ज्योत से ज्योत जलाते चलो" या उक्तीप्रमाणे डॉ. संतोष पाटील यांनी या वृक्षाची महती राज्यभर नेल्याने अनेकांना वृक्षारोपणाची प्रेरणा मिळत असल्याचे संतोष महाराज यांनी सांगितले. सिल्लोड तालुक्यातील आसडी, आमसरी, नागेश्वरनगर या भागातही या वृक्षांचे जतन केले जात असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**नांद्रुक : निसर्गाचा 'एअर कंडिशनर'**

नांद्रुक हा वृक्ष दिवसातून १८ ते २० तास ऑक्सिजन उत्सर्जित करतो. एक पूर्ण वाढलेले झाड दिवसाला सरासरी २७५ लिटर प्राणवायू देते, तर वर्षाला ४० किलो कार्बन डाय ऑक्साईड शोषून प्रदूषण घटवण्यास मदत करते. याशिवाय हळद्या, कोकिळ, बुलबुल, राखी धनेश यांसारख्या १५ हून अधिक प्रजातींच्या पक्ष्यांसाठी हा वृक्ष हक्काचे आश्रयस्थान ठरत आहे.

# श्रमिक सेनेच्या शिवजयंती उत्सवात कामगारांचे सन्मान : खा .डॉ . संजीव नाईक यांचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**


**निलेश फुंडे रेवदंडा :** श्रमिकांच्या कल्याणासाठी व राष्ट्रवादाच्या ध्येयाने कार्यरत असलेल्या श्रमिक सेनेच्या वतीने JSW ग्रीन स्टील लिमिटेड, सालाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा उत्सव भव्यतेने साजरा करण्यात आला. ही परंपरा 3 ऑगस्ट 1995 रोजी संस्थापक मा. वनमंत्री गणेशजी नाईक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाली असून, गेल्या 31 वर्षांपासून (1995 ते 2026) ही अखंड परंपरा कायम आहे. श्रमिक सेनेचे अध्यक्ष मा. खा. डॉ. संजीव गणेशजी नाईक यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली.छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला हार घालून पूजा करण्यात आली. यावेळी बोलताना खा. डॉ. संजीव नाईक म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतल्यावरच अंगावर काटा उभा राहतो. सोळाव्या शतकात त्यांनी मावळ्यांसोबत रक्तरंजित शपथ घेऊन स्वराज्याची स्थापना केली. मुघल आणि इतर शत्रूंविरुद्ध त्यांचा पराक्रम इतिहासात अमर झाला आहे. महाराष्ट्राच्या पावन कुशीत जन्मलेल्या व रायगडावर राज्याभिषेक झालेल्या या थोर नेत्यामुळे आज आपण स्वतंत्रपणे जगतोय. अशा भाग्यवान नेतृत्वाची आपल्याला प्राप्त झाली, ही खरी श्रीमंती आहे." त्यांच्या या बोलण्याने उपस्थित सर्वांमध्ये देशभक्तीचा भाव जागला.या उत्सवात श्रमिकांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी श्रमिक सेना युनियनतर्फे 'बेस्ट वर्कर अवॉर्ड' प्रदान करण्यात आले. JSW सालाव येथील काही निवडक कामगारांना हे पुरस्कार मिळाले. कामगारांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे JSW ग्रीन स्टील लिमिटेडसारख्या मोठ्या कंपनीला यश मिळत असल्याचे खा. नाईक यांनी नमूद केले. कामगार हे कंपनीचे खरे रत्न आहेत; त्यांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि कल्याणासाठी श्रमिक सेना सदैव लढते. कामगारांच्या कौशल्यामुळे उत्पादन वाढते, सुरक्षित वातावरण तयार होते आणि कंपनीचा दर्जा उंचावतो, असे ते म्हणाले. JSW सालाव कंपनीचे विश्वजीत सावंत, प्रवीण म्हात्रे, मोनिका शिरसागर, पकंज मलिक यांच्यासह श्रमिक सेनेचे सरचिटणीस चरण जाधव, कमिटी मेंबर्स अमित मोहिते, संदीप घाग, दिनेश पाटील, सचिन पाटील, शराफत हलदे यांचे खा. डॉ. संजीव नाईक यांनी स्वागत करून आभार मानले. या कार्यक्रमाने कामगार-कंपनी संबंध अधिक बळकट झाल्याचे दिसून आले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# उरण तालुक्यातील ' विंधणे ' येथे भव्य दिव्य अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळ्या सोबत स्मारकाचे ढोल ताशांच्या गजरात लोकार्पण सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**उमाकांत पानसरे/उरण प्रतिनिधी** : महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अत्यंत तेजस्वी आणि रुबाबदार रूपात अश्वारूढ पुतळ्याचे आणि स्मारकाचा लोकार्पण सोहळा समारंभ आज दिनांक 5 मार्च रोजी विंधणे तालुका उरण येथे सायंकाळी आठ वाजेच्या दरम्यान ढोल ताशा पथकांच्या गजरात आकर्षक रोषणाई सोबत छत्रपती शिवाजी महाराज की जय छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा स्थानिक गावकरी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या घोषणे ने दुमदुमलेल्या आनंदमय वातावरणात अतिशय उत्साहात संपन्न



झाला....... या शुभप्रसंगी तालुका कर्जतचे विधानसभा आमदार सन्माननीय महेंद्र थोरवे विश्वनाथ थोरवे माजी आमदार मनोहरशेठ भोईर उरण नगर परिषद नगराध्यक्षा सन्माननीय भावनाताई घाणेकर पंचायत समिती सदस्या सौ प्रियांका दिपक मढवी ॲड. भारत नवाले माजी सभापती जे.डी जोशी उद्योजक सन्माननीय पी.पी खारपाटील , सन्माननीय राजाशेठ खारपाटील , मा.प्रकाश सातपुते (डी. जी.एम ) अफकॉन इन्फ्राट्रक्चर कंपनी सन्माननीय देवराज राठोड , उद्योजक दत्तात्रेय भोईर , डॉ.संजय पाटील सी. के. टी कॉलेज प्राचार्य जेष्ठ शिक्षक स. ज. पाटील गुरुजी मा विनोद साबळे शिवसेना जिल्हा अध्यक्ष संतोष ठाकूर उरण तालुका अध्यक्ष शिवसेना उद्योजक सन्माननीय पी. डी. जोशी , वामन पाटील मधुकर नवाले दिपक नाईक या सर्व मान्यवरांसोबत विविध क्षेत्रातील नागरिकांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली ,

# दिग्रस येथील वैभव नगर विकासापासून कोसोदूर ; नवनिर्वाचित नगरसेवक विकास करतील का ?

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर/दिग्रस प्रतिनिधी** : दिग्रस शहरातील वैभव नगर देवरवाडी जुना रोड भागातील मागील नगर सेवक निवडणुकीच्या आधी मत मागण्या पुरता तुमच्या नगराचा विकास करणार असल्याचे पोकळ आश्वासन देऊन निवडून आले परंतु निवडून आल्यानंतर कोणताही विकास करण्यात आला नाही त्यामुळे नगरसेवकावर कोणत्याही विश्वास राहिला नसून येत्या निवडून आलेल्या नगरसेवकांनी तरी वैभव नगराचा विकास करावा अशी मागणी नागरिकाकडून होत आहे .

नगरपरिषद च्या हद्दीत असलेल्या वैभव नगर हे विकासापासून कोसो दूर असून प्रत्येकी निवडणुकीमध्ये पावसाळ्यात संपूर्ण रस्त्याने चिखलमय राहत असून गावातील नाल्या घाणीने तुम भरून असतात वैभव नगर येथे



नागरिकाचे आरोग्य धोक्यातआले आहे .

नगरपरिषद वैभव नगर येथील गेल्या वर्षभरात वैभव नगर वार्डा मध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. नगरातील अनेक ठिकाणच्या रस्त्यावर कचरा पसरला आहे. तर नगरातील नाल्या घाण व रोड चिखल डबक्यानी बरबटल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. पावसाळ्यापूर्वी लवकर स्वच्छता करणे आवश्यक असताना नगरपरिषद चे कर्मचारी थातुर मातुर थोडीफार नाली साफ झाल्याचे दिखावा करून जातात

वैभव नगरातील नाल्या दरवर्षी उपसल्या जात नाही, दो-तीन वर्षानी उपसतात. पण उपसा झाल्याचे मोबाईल वर फोटो घेऊन दाखवतात दरवर्षी काढते, हेही तेवढेच सत्य आहे. नाल्या चांगल्या उपसल्या जात नाही. कारण याकडे कृणी लक्ष देत नाही.विकासाच्या नावावर वैभव नगरात नाल्यावर रपटे व रस्ते हे ओबडथोबड बनवतात. एका वर्षात त्यांचे बारा वाजून जाते, असे काम विकासाच्या नावाखाली करण्यात येत आहेत व तसेच वैभव नगरात शंभर फुटाचा रोड अनेक वर्षापासून चिखल व चिखलानी भरून राहतात त्याकडे नगरपरिषद चे कर्मचारी व वार्डातील मेंबर यांनी कधीही लक्ष दिले नाही फक्त नगरपरिषद चे निवडणूक लढून निवडून येण्याचे काम केले या शंभर फुटाच्या रोडमुळे विद्यार्थ्यांना व नागरिकांना त्रास सहन करावे लागत आहे आता नगरपरिषद चे निवडणूकी मध्ये नवीन पिढी निवडून आणली आहे आता या नवीन नगर सेवक यांनी शंभर फुटाचे रोड यावर व नाली चे कामावर लक्ष देतील का असे जनतेचे लक्ष लागले आहे अनेक रस्त्यावर जनावरे बांधण्यात येत असल्याने मलमूत्र पसरलेले असते. असे घाणीचे साम्राज्य अनेक नगरामध्ये आहेत. परंतु याकडे , नगरपरिषद कर्मचारी काळजीपूर्वक लक्ष देत नाही. त्यामुळे अनेक नगरात पावसाळययात रोगराई पसरतअसल्याचे चित्र दरवरषीच पहावयास मिळतआहे. तरी नगरपरिषद समितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नगरपरिषद येतील वैभव नगर येथील नाली साफसफाईचे कामे झाल्याचे दिखावा करणाऱ्या नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांवर नवीन नगर सेवकांनी चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकाकडून होत आहे .

# कर्जत तालुक्यातील चिंचवली ग्रुप ग्रामपंचायतीच्या नावाने महिलांनी मारल्या शिमग्याच्या बोंबा

**दैनिक युवक आधार**

**खालापूर -संतोष शेवाळे** : ग्रुप ग्रामपंचायत चिंचवली अंतर्गत येणाऱ्या बार्डी गावातील पाणीटंचाईचा प्रश्न आता गंभीर बनला आहे. कर्जत तालुक्यातील या ग्रामपंचायतीच्या पाणी योजनेतून बार्डीला पाणीपुरवठा केला जात असला तरी मागील एक ते दीड वर्षांपासून तो पूर्णपणे अनियमित झाला असून ग्रामस्थ हैराण झाले आहेत.

चार-चार, पाच-पाच दिवसांनी नळांना पाणी येते. त्यातही पाण्याचा दाब अत्यंत कमी असल्याने एक



हंडाभर पाणी भरण्यासाठी अर्धा ते पाऊण तास लागत आहे. महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना व लहान मुलांना याचा मोठा फटका बसत आहे. दैनंदिन गरजांसाठी ग्रामस्थांना पर्यायी उपाय शोधावे लागत आहेत. ग्रामस्थांनी याबाबत अनेकवेळा ग्रामपंचायतीकडे लेखी अर्ज दिले असून ग्रामसभेतही विषय मांडला आहे. मात्र कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. तसेच पंचायत समिती कर्जत येथील गटविकास अधिकाऱ्यांनाही लेखी निवेदने देऊन प्रत्यक्ष भेट घेण्यात आली, तरीही परिस्थितीत सुधारणा झालेली नाही. दरम्यान, बार्डी गावाकडे येणाऱ्या मुख्य जलवाहिनीवर अनेक अनधिकृत जलवाहिनी जोडून देण्यात आल्याची बाब समोर आली आहे. या जोडण्यांमुळेच पाण्याचा दाब कमी होत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. यामागे आर्थिक गैरव्यवहाराची शक्यता असल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

“आमच्याकडे सर्व लेखी अर्जांच्या प्रती उपलब्ध आहेत. पाणीप्रश्न तातडीने न सुटल्यास पंचायत समिती कार्यालयासमोर मोठे आंदोलन छेडण्यात येईल,” असा इशारा बार्डी ग्रामस्थांनी दिला आहे. आता प्रशासनाने तातडीने चौकशी करून नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करणे गरजेचे आहे, अन्यथा बार्डीतील असंतोष तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# अंनिसच्या सिल्लोड शाखा अध्यक्षपदी ॲड . संतोष झाल्टे तर कार्याध्यक्षपदी डॉ . प्रकाश बिऱ्हाडे यांची फेरनिवड

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड**: शहरातील इंद्रराज महाविद्यालयात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची (अंनिस) महत्त्वाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत सिल्लोड शाखा अध्यक्षपदी ॲड. संतोष झाल्टे यांची, तर कार्याध्यक्षपदी डॉ. प्रकाश बिऱ्हाडे यांची सर्वानुमते फेरनिवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा प्रधान सचिव प्रा. शिवाजी वाठोरे होते. यावेळी जाहीर करण्यात आलेली नूतन कार्यकारिणी अशी: उपाध्यक्ष- प्रा. डॉ. व्यंकटेश लांब, जगदीश बेदवे; प्रधान सचिव- एन. आर. फाळके, सचिन दांडगे, सीताराम काळे; बुवाबाजी विरोधी संघर्ष कार्यवाह- हरिदास वाघ, सहकार्यवाह- मुसाखान पठाण; विविध उपक्रम कार्यवाह- प्रा. डॉ. अनिरुद्ध मोरे, सहकार्यवाह- अनिल साबळे; वैज्ञानिक जाणिवा कार्यवाह- प्रा.



डॉ. जगदीश सावदेकर, सहकार्यवाह- डॉ. सचिन साबळे, डॉ. दत्तात्रेय भवर; महिला कार्यवाह- प्राचार्य अर्चना अहिरे, सहकार्यवाह- सरला कामे; युवा कार्यवाह- गजानन इंगळे, सहकार्यवाह- नितीन निकम; सांस्कृतिक कार्यक्रम कार्यवाह- रुपेश ठाकूर, सहकार्यवाह- किसनराव शिंदे. बैठकीचे सूत्रसंचालन एन. आर. फाळके यांनी केले, तर प्रा. डॉ. अनिरुद्ध मोरे यांनी आभार मानले. या निवडीबद्दल नूतन पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# मुदखेड सार्वजनिक क्रीडा संकुलाला ‘ डॉ . बाबासाहेब आंबेडकर ’ नाव देण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड | प्रतिनिधी योगेश चौदंते** : मुदखेड येथील सार्वजनिक क्रीडा संकुल / स्टेडियमला “भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल, मुदखेड” असे अधिकृत नामकरण करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मा. मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मुदखेड हे तालुक्यातील एक प्रमुख शैक्षणिक व क्रीडा केंद्र असून येथे दररोज हजारो तरुण खेळाडू सरावासाठी येतात तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे



आयोजनही केले जाते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला केवळ संविधानच दिले नाही, तर “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” हा मूलमंत्र देत तरुणांना प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे शिस्त, जिद्द आणि संघर्षाची भावना बळकट होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

मुदखेड येथील क्रीडा संकुलाला डॉ. आंबेडकर यांचे नाव दिल्यास येथील खेळाडूंना व भावी पिढीला प्रेरणा मिळेल व शहरासाठी तो अभिमानाचा विषय ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

**या मागण्यांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे** –

सार्वजनिक क्रीडा संकुलाचे अधिकृत नामकरण “भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल, मुदखेड” असे करण्यात यावे.

नगर परिषदेकडील सर्वसाधारण सभेत नामकरणाचा ठराव मंजूर करण्यात यावा.

स्टेडियमच्या मुख्य प्रवेशद्वारावर नामफलक सन्मानपूर्वक लावण्यात यावा.

प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून त्वरित कार्यवाही करावी, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली आहे.

हे निवेदन कुणाल देविदासराव चौदंते भिम नगर मुदखेड यांच्या वतीने सादर करण्यात आले असून प्रत माहितीसाठी मा. आ. श्रीजयताई चव्हाण, 85-भोकर मतदारसंघ यांनाही देण्यात आली आहे.

# सिल्लोडमध्ये तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचा विस्तार ; ३५ अधिकाऱ्यांचा जाहीर प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड** :- तालुक्यात होळीच्या शुभ मुहूर्तावर 'महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटने'ची मुहूर्तमेढ रोवण्यात आली आहे. संघटनेचे राज्याध्यक्ष नितीन धामणे व राज्य सरचिटणीस हरिश्चंद्र काळे यांच्या ध्येयधोरणांनी प्रेरित होऊन तालुक्यातील ३५ ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी संघटनेत जाहीर प्रवेश केला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने अधिकारी संघटित झाल्याने या घटनेची सध्या चर्चा रंगली आहे.

या विशेष कार्यक्रमात तालुका कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली. यामध्ये तालुका अध्यक्ष म्हणून गणेश जिवरग तर तालुका सरचिटणीस म्हणून विनोद गायकवाड यांची एकमताने निवड झाली. उर्वरित कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी नंदकुमार कापडे, मानद अध्यक्षपदी श्रावण अंभोरे व



कोषाध्यक्षपदी श्री. मुकाडे यांची नियुक्ती करण्यात आली.

सदर निवड प्रक्रिया संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष मधुकर मुंगल, राज्य कोषाध्यक्ष महेंद्र निकम, राज्य संघटक टाकळकर, जिल्हाध्यक्ष सुरेश चौधरी व जिल्हा सरचिटणीस प्रदीप कुंवर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. "भविष्यात कोणत्याही तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी बांधवावर अन्याय होऊ दिला जाणार नाही, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी ही कार्यकारिणी सदैव तत्पर राहील," अशी ग्वाही नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी दिली.याप्रसंगी हारून तडवी, जयदीप सुरसे, श्री. त्रिभुवन, श्री. पाटील, आर. एस. वाघ, रवी गंगावणे, श्री. वळवी, श्री. खेडकर, रमेश पवार, श्री. हाके, दिनकर तांबट, श्री. निकाळे, दिनेश राठोड, डॉ. हुमणे, श्री. भिवसणे, एल. आर. कोळी यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावण अंभोरे यांनी केले, तर आभार जयदीप सुरसे यांनी मानले.

# मातृभुमि प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने डॉ.राजेंद्र सानप सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : मातृभुमि प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्याना राज्यस्तरीय पुरस्कारानी सन्मानित करण्यात आले. या वेळी "समाजरत्न पुरस्कार-२०२६" हा पुरस्कार सार्वजनिक ग्रंथालय चळवळीत ३५ वर्षांपासून स्वतःला वाहून घेणारे सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक क्षेत्रात सक्रिय सहभागी असणारे बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे मा. कोषाध्यक्ष व सध्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे सदस्य व श्री संत भगवानबाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र सानप यांना जेष्ठ सामाजिक नेत्या प्रा.सुशिलाताई मोराळे




यांच्या हस्ते समाजरत्न पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले. या वेळी ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे, राज्य ऊसतोड कामगार नेते गहिनीनाथ थोरे, इंजि.उत्तमराव मिसाळ, प्रा आर.टी.गर्जे, डॉ.संजय तांदळे यांच्या सह असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत दि. ०१ मार्च रोजी श्री संत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान येथे वंजारी समाज वधु वर सूचक मेळाव्यात पुरस्कार वितरण करण्यात आले. बीड जिल्हात शासनाच्या "गाव तिथे ग्रंथालय! या धोरणानुसार गावा गावात ग्रंथालय चळवळ उभारली जावी या साठी गेल्या ३५ वर्षापासुन ग्रंथालय क्षेत्रात रचनात्मक कार्य करणाऱ्या ग्रंथप्रेमी डॉ.राजेंद्र सानप यांनी गत १४ वर्षांपासून श्री संत भगवानबाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडच्या माध्यमातून १४ वार्षिक सप्ताह व ३१३ किर्तनाचे आयोजन करून समाजाला आध्यत्मिक प्रबोधन करण्याचे कार्य केले आहे. १८ वर्षापासुन विना वर्गणी राष्ट्रसंत भगवानबाबा यांचा जन्मोत्सव कार्यक्रम उत्कृष्टपणे आयोजित करून आदर्श जयंती साजरी करणे बीड शहरात गुरूवर्य भगवान महाराज सार्वजनिक वाचनालय इंद्रप्रस्थ कॉलनी बीड चे संस्थापक आहेत. या वाचनालयात १२ हजार ग्रंथ संपदा वाचनालयाची स्वत:ची पुरेशी इमारत वाचकाच्या सेवेसाठी उभारून वाचन चळवळ अधिकाधिक वृद्धिंगत केली आहे. विविध सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ.राजेंद्र सानप यांना अनेक राज्य स्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. मातृभुमि प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातुन अभिनंदन करण्यात येत आहे. या कार्यक्रमास मान्यवरा सह बहुसंख्येने समाज बांधव उपस्थितीत होते.

# महाराजस्व समाधान शिबिराचा लाभ घ्या – तहसीलदार देऊळगावकर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/ प्रकाश गवारे** : शेतकरी व नागरिकांनी शासनाच्या ‘छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व समाधान शिबिर’ (टप्पा क्र. १) या विशेष अभियानाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार डॉ. आनंद देऊळगावकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

शासनाच्या निर्णयानुसार ७ मार्च ते १५ मे या कालावधीत तालुक्यातील विविध मंडळांमध्ये या शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत ही शिबिरे पार पडतील.

यामध्ये ७ मार्च – बारड मंडळ (ग्रामपंचायत कार्यालय, बारड), १४ मार्च – मुगट मंडळ (ग्रामपंचायत कार्यालय, मुगट), १० एप्रिल – बारड मंडळ (हनुमान मंदिर कार्यालय, निवघा), १७ एप्रिल – मुगट मंडळ (हनुमान मंदिर, माळकौठा), ८ मे – मुदखेड मंडळ (तहसील कार्यालय, मुदखेड) आणि १५ मे – मुदखेड मंडळ (ग्रामपंचायत कार्यालय, मेंडका) येथे शिबिरे होणार आहेत.

या शिबिरांमध्ये फेरफार अदालत, अभिलेख दुरुस्ती, ७/१२ व ८ अ उताऱ्यांचे वितरण, पांदण रस्ते प्रकरणे, विद्यार्थ्यांना विविध दाखले, तसेच आयुष्यमान कार्ड डेटा नोंदणी आदी सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच भूमी अभिलेख, पंचायत समिती, कृषी, दुय्यम निबंधक, वन, आरोग्य व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित राहून अर्ज व तक्रारींचे तत्काळ निराकरण करणार आहेत.

महसुली प्रश्नांचा जलद निपटारा करण्याची ही चांगली संधी असल्याने सर्व नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित दिवशी उपस्थित राहून शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार डॉ. आनंद देऊळगावकर यांनी केले आहे.

# पनवेल महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवक व समिती सदस्यांची निवड जाहीर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर महापौर, उपमहापौर यांच्या निवडीची प्रकिया पूर्ण झाल्यानंतर आज (दि. ०६ मार्च )स्वीकृत नगरसेवक, स्थायी समिती आणि महिला व बाल कल्याण समितींच्या सदस्यांची निवड झाली. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत नाट्यगृहात झालेल्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या निवडी जाहीर करण्यात आल्या. या निवडी संदर्भात पीठासीन अधिकारी म्हणून महापौर नितीन पाटील यांनी काम पाहिले. या सभेला उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, सचिव नानासाहेब कामठे यांच्यासह नगसेवक, नगरसेविका उपस्थित होते.

महापालिकेत भाजप महायुतीचे एकूण ५९ नगरसेवक विजयी झाल्याने त्यांना ५ स्वीकृत नगरसेवक पदे मिळाली. तर शेकाप-काँग्रेस गट व उबाठा गटाला प्रत्येकी एक पद मिळाले. त्यानुसार स्वीकृत नगरसेवक म्हणून सभागृहाचा दांडगा अनुभव असलेले युवा नेते परेश ठाकूर, ॲड. प्रथमेश सोमण, गणेश कडू, डॉ. अरुणकुमार भगत, दिनेश खानावकर यांची तर शेकाप-काँग्रेस गटातून प्रकाश म्हात्रे व उबाठा गटातून नितीन गावंड यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. संख्याबळानुसार स्थायी समिती आणि महिला व बाल कल्याण समितीमध्ये महायुतीला १२, शेकाप काँग्रेस गटाला तीन तर उबाठा गटाला एक सदस्यपद ग्राह्य झाले. त्यामध्ये भाजप महायुतीकडून प्रवीण पाटील, मधू पाटील, समीर कदम, बबन मुकादम, रविंद्र भगत, विजय खानावकर, हेमलता गोवारी, रविंद्र जोशी, राजेश्री वावेकर, ॲड. मनोज भुजबळ, रुचिता



लोंढे आणि अजय बहिरा, शेकाप कॉंग्रेस गटाचे अरविंद म्हात्रे, हरेश केणी, तुषार पाटील व उबाठा गटातून प्रिया गोवारी यांची निवड झाली आहे. महिला व बाल कल्याण समितीसाठी भाजप महायुतीमधून लीना म्हात्रे, अनिता पाटील, सोनल नवघरे, बायजा बारगजे, प्रतिभा भोईर, सरस्वती काथारा, शिला भगत, कुसुम पाटील, अस्मिता घरत, ममता म्हात्रे, रुचिता लोंढे, प्रियंका कांडपिळे, शेकाप काँग्रेस गटातून योगिता फडके, मनिषा म्हात्रे, अर्चना भोईर तर उबाठा गटातील मेघना घाडगे यांची निवड झाली आहे.

महाविकास आघाडीतून लीना गरड यांच्या नेतृत्वाखाली उबाठा गटाने फारकत घेतल्याने महाविकास आघाडीत अंतर्गत मतभेद आणि बिघाडीचे चित्र स्पष्टपणे समोर आले आहे. सभेच्या पार्श्वभूमीवर ही राजकीय घडामोड विशेष चर्चेचा विषय ठरली. सभा सुरू होण्यापूर्वी विरोधी पक्षाकडून विमानतळाच्या नामकरणासंदर्भात लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न झाला मात्र याच विरोधी पक्षाने लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाला कडाडून विरोध केला होता. दिबांच्या नावासाठी झालेल्या लढ्यात सहभागी झाले नाहीत याचा जाणीवपूर्वक विसर त्यांना पडला होता. त्यामुळे विरोधी पक्षाने सभागृहात स्वतःचे हसे करून घेतले.

त्याचबरोबरीने सभेच्या विषय पत्रिका नुसार कामकाज सुरु करताना शेकापचे नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी मध्येच गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. सभागृहनेता, विरोधी पक्षनेता निवडीबद्दल नियमाची मांडणी करण्याचा प्रयत्न केला. मात्र सचिवांनी कायद्याच्या बाबी अधोरेखित करून विषय पत्रिका योग्य असल्याचे नमूद केले. यावेळी सभागृहाच्या कामकाजात नेहमीच विरोधी भूमिका घेणाऱ्या अरविंद म्हात्रे यांच्या भूमिकेवर महापौर नितीन पाटील यांनी सडेतोड भाष्य केले. "कायम तुम्ही विरोधी पक्षातच राहावे," असे स्पष्ट वक्तव्य करत त्यांनी विरोधी पक्षाची बोलती बंद केली. सभेच्या शेवटी नगरविकास सचिवांनी अधिकृतपणे सभागृहाचे कामकाज संपल्याची घोषणा केली. मात्र त्यानंतरही अरविंद म्हात्रे यांनी अनावश्यक गोंधळ घालण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. या प्रकारामुळे विरोधी पक्षाला सभागृहाच्या कामकाजाबाबत पुरेशी अभ्यासपूर्ण माहिती नसल्याचे या सभेच्या माध्यमातून अधोरेखित झाले.

# उमरी नगरपरिषद कार्यालयास स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2 .0 अंतर्गत मैला उपसा (3000 लिटर) क्षमतेचे वाहन प्राप्त

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर /रुपेशकुमार ग.श्रीरामवार** : स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत उमरी नगरपरिषद कार्यालयास मैला उपसा (3000 लिटर) क्षमतेचे वाहन प्राप्त झाले आहे. सदर वाहनाचे मा.नगरअध्यक्षा सौ.शकुंतला भगवान मुदीराज व उपाध्यक्ष श्री.कैलासभाऊ देशमुख गोरठकर व सर्व सन्माननीय सदस्य, नगरपरिषद उमरी यांच्या हस्ते आज दिनांक 06/03/2026 रोजी नगरपरिषद कार्यालयात लोकार्पण करण्यात आले आहे.

तसेच माझी वसुंधरा अभियान 6.0 अंतर्गत भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश या पंचतत्वावर नागरिकांमध्ये जनजागृती होण्याच्या दृष्टीने E-Pledge शपथ घेण्यात आली. त्याचबरोबर प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी रु.1.00 लक्ष प्रमाणे 37 लक्ष रुपयाचा निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यावेळी मुख्याधिकारी श्री गणेश चाटे, कु.कांचन पडलवार, कार्यालय अधिक्षक, श्री कैलाश येमेलवाड, नगर अभियंता,श्री बालाजी





चवरे, लेखापाल, श्री विनोद सावंत, नगर अभियंता, कु.पुजा पावडे, रचना सहायक, श्री पिंडकूरवार, वरीष्ठ लिपीक श्री गणेश मदने, श्री सचिन गंगासागरे, श्री चंद्रकांत श्रीकांबळे-मुकदम, शकीलखॉन पठाण-अभियंता, श्री सुर्यकांत माळवतकर, गंगाधर पवार,शंकर माने,आकाश खंदारे, रमाबाई करपे, पिराजी गायकवाड, नरेंद्र खंदारे, शंकर पाटील, अंकुश सवई ,माधव जाधव,गौतम सोनफळे , सन्माननीय पत्रकार व शहरातील नागरिक ,नगरपरिषद कर्मचारी उपस्थित होते.

# उद्या कुसुम सभागृहात भारत- न्यूझीलंड अंतिम सामना मोठ्या पडद्यावर : अमरनाथ राजूरकर, दिलीप ठाकूर यांची माहिती

**दैनिक युवक आधार**

**देवीदास एंगडे/नांदेड ता० प्रतींनिधी** : शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारतीय संघाने इंग्लंडचा पराभव करून दणदणीत विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. या पार्श्वभूमीवर क्रिकेटप्रेमींना अंतिम सामन्याचा थरार एकत्र अनुभवता यावा यासाठी भाजप नांदेड महानगरतर्फे रविवार दि. ८ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता कुसुम सभागृह, व्हीआयपी रोड, नांदेड येथे भारत विरुद्ध न्यूझीलंड हा अंतिम सामना मोठ्या पडद्यावर मोफत दाखविण्यात येणार असल्याची माहिती महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर व जिल्हा सरचिटणीस धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांनी दिली आहे.

प्रत्येक क्रिकेटप्रेमीची इच्छा स्टेडियममध्ये जाऊन सामना पाहण्याची असते. मात्र वेळेअभावी तसेच प्रचंड तिकीट दरांमुळे अनेकांना प्रत्यक्ष स्टेडियममध्ये जाऊन सामना पाहणे




शक्य होत नाही. अशा वेळी भरगच्च सभागृहात मोठ्या पडद्यावर सामना पाहताना स्टेडियममध्ये सामना पाहण्यासारखाच थरार आणि उत्साह अनुभवायला मिळतो. याच उद्देशाने नांदेडमधील क्रीडारसिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमाला महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, प्रदेश उपाध्यक्ष संजय कोडगे व ॲड. चैतन्यबापू देशमुख, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे तसेच ॲड. किशोर देशमुख,महापौर कविता मुळे, उपमहापौर दिपकसिंह रावत,सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे,डॉ. सचिन उमरेकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.यंदाच्या ट्वेंटी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपांत्य फेरीत इंग्लंडवर मात केली आणि अंतिम फेरीत धडक मारली. विशेष म्हणजे २० षटकांच्या विश्वचषकाच्या इतिहासात आतापर्यंत कोणताही यजमान संघ अंतिम फेरीत पोहोचला नव्हता. भारतीय संघाने ही ऐतिहासिक कामगिरी करत देशातील क्रिकेटप्रेमींमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला आहे. तसेच सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याची आणि यजमान संघ म्हणून विश्वचषक जिंकण्याची संधी प्रथमच भारताला मिळत असल्यामुळे. अंतिम.उत्सुकता.शिगेला.पोहोचली. आहे. क्रिकेटप्रेमींना एकत्र येऊन या सामन्याचा आनंद लुटता यावा, यासाठी मोठ्या पडद्यावर सामन्याचे प्रक्षेपण करण्याची परंपरा धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांनी अनेक वर्षांपासून जपली आहे. १९९५ पासून ट्वेंटी-२० तसेच ५० षटकांच्या विश्वचषक स्पर्धांतील सामने शहरात मोठ्या पडद्यावर दाखवण्याचा उपक्रम त्यांनी सातत्याने राबविला असून मोठ्या पडद्यावर सामना दाखवण्याची ही १८ वी वेळ ठरणार आहे. भारताच्या विजयाच्या वेळी क्रीडारसिकांचा उत्स्फूर्त जल्लोष आणि देशभक्तीचा माहोल निर्माण होणे ही या कार्यक्रमाची खासियत ठरते.रविवारी होणाऱ्या या रोमांचक अंतिम सामन्याचे प्रक्षेपण यशस्वी करण्यासाठी सुरेश लोट, कामाजी सरोदे, सुरेश शर्मा, अरुणकुमार काबरा, संतोष भारती, राजेशसिंह ठाकूर, सुरेश निलावार, जगतसिंग ठाकूर व शिवा लोट हे परिश्रम घेत आहेत. कुसुम सभागृहात मर्यादित आसनव्यवस्था असल्याने जे प्रथम येतील त्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. भारताच्या विजयी अभियानाचा थरार मोठ्या पडद्यावर अनुभवण्यासाठी नांदेड शहरातील क्रीडारसिकांनी मोठ्या संख्येने वेळेवर कुसुम सभागृहात उपस्थित राहावे, असे आवाहन माजी आमदार अमरनाथ राजूरकर व धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांनी केले आहे.

# दिव्यांग लाभार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना; २५ मार्चपूर्वी UDID कार्ड-आधार संलग्नीकरण अनिवार्य, अन्यथा अनुदान थांबण्याची शक्यता!

**दैनिक युवक आधार**

**रणजीत सिंह.ठाकुर/रिसोड तालुका प्रतिनिधी** : रिसोड तालुक्यातील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांसाठी शासनाने महत्त्वाची सूचना जारी केली असून विशेष सहाय्य योजनांचा लाभ सुरू ठेवण्यासाठी UDID कार्ड आणि आधार कार्ड संलग्नीकरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार ही प्रक्रिया निश्चित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.



शासन निर्णय दिनांक २० ऑगस्ट २०१९ नुसार विशेष सहाय्य योजनेंतील लाभार्थ्यांचे आधार कार्ड संबंधित योजनांशी ३ महिन्यांच्या आत संलग्न करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानंतर १५ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिव्यांग लाभार्थ्यांना मिळणारे मासिक अर्थसहाय्य १५०० रुपयांवरून २५०० रुपये इतके वाढविण्यात आले आहे. हे अनुदान डीबीटी पोर्टलद्वारे थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

याशिवाय दिव्यांगांसाठी शासनाच्या विविध योजना व सवलतींचा लाभ मिळविण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण ओळखपत्र (UDID Card) अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे रिसोड तालुक्यातील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले UDID कार्ड व आधार कार्ड अद्ययावत करून संलग्नीकरण प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, २५ मार्च २०२६ पूर्वी सर्व लाभार्थ्यांनी आपले UDID कार्ड आणि आधार कार्ड आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकारी किंवा महसूल सेवक यांच्याकडे जमा करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जर संबंधित लाभार्थ्यांनी वेळेत UDID कार्ड आणि आधार संलग्नीकरण केले नाही, तर त्यांचे शासनाकडून मिळणारे अनुदान बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

त्यामुळे रिसोड तालुक्यातील संजय गांधी व श्रावणबाळ योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांनी तातडीने UDID कार्ड व आधार कार्ड ग्राम महसूल अधिकारी किंवा महसूल सेवकांकडे जमा करून प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार यांच्या कडून माजी आ. भीमराव धोंडे यांची मागणी मान्य

## बीड येथे होणार स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/ मारुती सत्रे** : ऑलिम्पिक पदक विजेते, भारताच्या क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद झालेल्या स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा-२०२६ बीड येथे आयोजित करण्याच्या माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या मागणीला यश आले. उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथे झालेल्या बैठकीत विविध राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजनाबाबत निर्णय झाला.

महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे यांनी ही मागणी केली होती. या मागणीची दखल घेत ना. सुनेत्राताई पवार यांनी मागणी मान्य केल्याने जिल्ह्यातील कुस्ती प्रेमींना पर्वणी मिळणार आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा - २०२६ चे आयोजन बीड येथे करण्यास उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी मान्यता दिलेली आहे.क्रिडा क्षेत्राविषयी अत्यंत आवड असलेले कुस्तीपटू व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी भीमराव धोंडे यांनी राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा



बीड येथे घेण्याची मागणी मान्य झाल्याने जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक संधी निर्माण झाली आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेमुळे जिल्ह्यातील समृद्ध कुस्ती परंपरेला नवे बळ मिळणार असून ग्रामीण आणि शहरी भागातील अनेक होतकरू मल्लांना आपल्या ताकदीचे व कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. तसेच युवा पिढीमध्ये पारंपरिक मातीतील कुस्तीबद्दल नव्याने प्रेरणा निर्माण होण्यासही मोठी मदत होणार आहे.

जिल्ह्यात ही प्रतिष्ठेची स्पर्धा आयोजित होणार असल्याने जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी, मल्ल आणि कुस्ती परंपरेशी जोडलेल्या नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.मागणीची दखल घेऊन सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल ना. सुनेत्राताई अजितदादा पवार यांचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आभार मानले आहेत.

# ६० व्या वर्षी उभा केला स्वावलंबनाचा मार्ग; देशी कोंबडीपालन अनेक महिलांसाठी प्रेरणादायी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील वासुद गावात राहणाऱ्या एका ६० वर्षीय महिलेने परिस्थितीशी झुंज देत स्वावलंबनाचा मार्ग निवडला आहे. चार महिन्यांपूर्वी त्यांनी घराच्या अंगणात छोटेखानी शेड उभारून देशी कोंबडीपालन व्यवसाय सुरू केला असून आज हा उपक्रम गावातील महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि आर्थिक अडचणींचा सामना करत त्यांनी सुरुवातीला ५० लहान देशी कोंबड्या खरेदी केल्या. अंगणातच जाळीचे कंपाऊंड करून छोट्या शेडमध्ये त्यांचे संगोपन सुरू केले. मर्यादित साधनसामग्री असतानाही त्यांनी मेहनत, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर हा व्यवसाय उभा केला. देशी कोंबड्यांची अंडी आणि मांसाला ग्रामीण भागात चांगली मागणी असल्याने त्यांना स्थानिक बाजारात



चांगला प्रतिसाद मिळणार आहे. दररोज कोंबड्यांची काळजी घेणे, स्वच्छता राखणे, योग्य खाद्य देणे आणि सुरक्षितता यावर त्यांनी विशेष लक्ष दिले आहे. त्यामुळे त्यांच्या कोंबड्या चांगल्या वाढत असून व्यवसाय हळूहळू स्थिर होत आहे.ग्रामीण भागात अनेक महिला आर्थिक अडचणींमुळे खचून जातात; मात्र या महिलेने पती नसतानाही वयाच्या साठीनंतरही हार न मानता स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या या प्रयत्नामुळे गावातील इतर महिलांनाही कोंबडीपालनासारख्या लघुउद्योगांकडे वळण्याची प्रेरणा मिळत आहे.योग्य मार्गदर्शन आणि सरकारी योजनांचा लाभ मिळाल्यास हा व्यवसाय आणखी व्यापक करण्याचा त्यांचा मानस आहे. संघर्षातून उभा राहिलेला हा छोटा उद्योग ग्रामीण महिलांसाठी आत्मविश्वास आणि स्वावलंबनाचा नवा संदेश देत आहे.

# खमारी (बुटी) येथे सरपंचांवर पदाचा गैरवापर केल्याचा आरोप; तहसीलदारांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/ लाखनी भंडारा :** भंडारा तालुक्यातील खमारी (बुटी) गावातील सरपंच नलिनी काळे या आपल्या पदाचा गैरवापर करून एका व्यक्तीला हेतुपुरस्सर त्रास देत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत तहसीलदारांना निवेदन देऊन चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, पुरुषोत्तम मेश्राम यांना लक्ष्य करून त्यांच्या घरासमोरील अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली त्रास दिला जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. संबंधित घर १९७९ पासून अस्तित्वात असून त्या घराचा कर नियमित भरला जात असल्याचेही निवेदनात सांगण्यात आले आहे. तसेच ग्रामसेवकांना डावलून सरपंच मनमर्जीने कारभार करत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दि. ६ मार्च २०२६ रोजी आझाद समाज पार्टी (कांशीराम ) च्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.यावेळी आझाद समाज पार्टीचे संतोष ऊकणकर ( जिल्हा महासचिव ), युगांतर मेश्राम (भंडारा तालुकाध्यक्ष), ग्यानचंद जांभुळकर (पूर्व विदर्भ सचिव), रवींद्र जनबंधू (भंडारा जिल्हा सचिव), मंगेश नंदेश्वर, अश्विन गोस्वामी व अमोल भिवगडे उपस्थित होते.

# लाईनमन सर्वांच्या आयुष्यात उजेड पेरणारे प्रकाशदूत - डॉ. महेश बनकर

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी** : महावितरण निफाड उपविभागाच्या वतीने ०४ मार्च रोजी "लाईनमन दिवस" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी निफाड तालुक्यातील सर्वच कक्षाचे लाईनमन यांचा यथोचित गौरव करण्यात आला.

रात्र-दिवस, ऊन- वारा- पाऊस, सन-वार ह्या कुठल्याच गोष्टीची तमा न बाळगता आपल्या कामाला प्राधान्य देणारा आणि कर्तव्याला पूजा मानून वाटचाल करणारा लाईनमन हा खरोखर ग्रेट असतो, पण जीव मुठीत धरून आणि प्रत्येक ठिकाणी संघर्ष आणि मेहनत करणारा लाईनमन हा आजच्या समाजात दुर्लक्षित घटक बनून राहिला, ही खरी शोकांतिका आहे. वैज्ञानिक प्रगती आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात, आज सर्व गोष्टी विद्युत विजेवर अवलंबून आहे. परंतु या विद्युत विजेचा समतोल पुरवठा आणि अचूक नियोजन ज्यांच्या माध्यमातून होते. असे *"सर्व लाइनमन हे समाजातील सर्वच व्यक्तींच्या आयुष्यात उजेडरुपी आनंद पेरणारे प्रकाशदूत"* असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ. महेश बनकर यांनी केले.

महावितरण निफाड उपविभाग येथे आयोजित ०४ मार्च लाईनमन दिवस या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून डॉ. महेश बनकर बोलत होते. पुढे ते म्हणाले की, लाईनमन जसे सामाजिक कर्तव्य पार पाडतात तसेच त्यांचे काही वैयक्तिक व कौटुंबिक कर्तव्य देखील आहेत. आपल्या स्वतःचे व कुटुंबाचे भावनिक व मानसिक आरोग्य आनंदी ठेवण्यासाठी, कौटुंबिक संवाद होणे गरजेचे आहे, आपण शेवटी खूप



**प्रमुख वक्ते प्रा. डॉ. महेश बनकर यावेळी व्यासपीठावर, कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ लाईनमन पांडुरंग हांडगे, चांदवड विभागाचे कार्यकारी अभियंता योगेश निकम, निफाड उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता सुनील राऊत, कक्ष अभियंते हेमंत शिनकर, उपअभियंता जितेंद्र बोरसे व मान्यवर...**

खळखळून कधी हसलो होतो?, आई किंवा पत्नीने तयार केलेल्या जेवण किंवा चहाची स्तुती करून आपण त्यांना आनंद दिला का ? यावर आत्मचिंतन करण्याची गरज आहे.

मुलांचे बालपण व शिक्षण ज्येष्ठांचे आरोग्य यासाठी प्रयत्नशील राहून स्वतःच्या कुटुंबात देखील आपण आनंदाचा प्रकाश पेरावा असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

यावेळी व्यासपीठावर, कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ लाईनमन पांडुरंग हांडगे, चांदवड विभागाचे कार्यकारी अभियंता योगेश निकम, निफाड उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता सुनील राऊत, कक्ष अभियंते हेमंत शिनकर,जितेंद्र बोरसे, साकेत पाटील, किरण पवार, श्रीमती गायत्री चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यकारी अभियंता योगेश निकम यांनी यावेळी लाईनमन यांनी प्रत्यक्ष काम करताना घ्यावयाची काळजी, कामातील अडचणी व त्यावरील उपाय योजना याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच उपकार्यकारी अभियंता सुनील राऊत, पांडुरंग हांडगे, विलास वडघुले आणि लाईनमन यांनी यावेळी मनोगते व्यक्त केली,

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली.

उपस्थित सर्व लाईनमन यांचा भेट वस्तू देऊन यथोचित गौरव व सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदरजी लटपटे, नाशिक मंडळाचे अधिक्षक अभियंता राजेश थुल यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

प्रास्तविक प्रवीण आहेर, सूत्रसंचालन जितेंद्र बोरसे यांनी केले तर आभार अभिजित घुगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी उपविभागातील सर्वच लाईनमन बांधव, यंत्रचालक व बहुसंख्य कर्मचारी श्रोत उपस्थित होते.

# ग्रामपंचायत अधिकारी संघटनेत मोठ्या नियुक्त्या ; रिसोड तालुक्यात नव्या पदाधिकाऱ्यांची निवड

## बी. एस. भुतेकर यांची तालुका सचिवपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**रणजीत. ठाकुर/ रिसोड तालुका प्रतिनिधी** : रिसोड (वाशिम )ग्रामपंचायत अधिकारी संघटना DNA 136 ची महत्त्वपूर्ण सभा आज दि. ०५ मार्च २०२६ रोजी तालुका अध्यक्ष राजेश बी. आरु यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीत तालुका व जिल्ह्यातील रिक्त पदांवर प्रतिनिधी नियुक्त करण्याबाबत सविस्तर चर्चा करून विविध पदांवर नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

सभेत राजेंद्र रामराम खरबळ यांची जिल्हा उपाध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली. तसेच बळीराम एस. भुतेकर यांची रिसोड तालुका सचिव म्हणून निवड करण्यात आली. त्यांच्या नियुक्तीमुळे संघटनेच्या कामकाजाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

याचप्रमाणे विलास शिंदे यांची जिल्हा निमंत्रक म्हणून निवड करण्यात आली. तालुक्यातील रिक्त पदांसाठी जी. पी. देशमाने यांची तालुका निमंत्रक, एस. डी. शिंदे व एस. एस. ढंगारे यांची विधी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच भाग्यश्री पी. माळोदे यांची तालुका कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

या नियुक्त्यांमुळे संघटनेच्या कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास सभेत व्यक्त करण्यात आला.

यावेळी नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# विकसित महाराष्ट्र २०४७ 'चा रोडमॅप ; अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, शेती आणि रोजगारावर भर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नासिकेत पानसरे/ पनवेल** : सरकारने आज विधानसभेत २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना "विकसित महाराष्ट्र २०४७" या दीर्घकालीन दृष्टीकोनावर भर दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा अर्थसंकल्प सादर करत राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध महत्त्वाच्या योजना आणि उपक्रमांची घोषणा केली.

अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री म्हणाले की, हा अर्थसंकल्प केवळ पुढील वर्षाचा आर्थिक आराखडा नसून महाराष्ट्राला २०४७ पर्यंत विकसित राज्य बनविण्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

भाषणाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांसह अनेक महापुरुषांना अभिवादन केले. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त २०२६-२७ मध्ये विविध सामाजिक कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्यासाठी विशेष समिती स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. तसेच संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त "संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट" विकसित करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी राज्य सरकारने "संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान" राबविण्याची घोषणा केली. या अभियानाद्वारे ग्रामीण पायाभूत सुविधा, स्वच्छता, रोजगार आणि आर्थिक विकासाला चालना दिली जाणार आहे. ग्रामीण भागातील जीवनमान सुधारण्यासाठी विविध विभागांच्या योजना एकत्रितपणे राबविण्याचा सरकारचा प्रयत्न असेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याचे संकेत दिले आहेत. विशेषतः रस्ते आणि द्रुतगती मार्ग, जलसंपदा प्रकल्प, औद्योगिक कॉरिडॉर, शहरी वाहतूक व्यवस्था तसेच मेट्रो आणि सार्वजनिक परिवहन या क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. या माध्यमातून राज्यात उद्योग, गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी वाढवण्याचा सरकारचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. अर्थसंकल्पात शेती क्षेत्रालाही विशेष प्राधान्य देण्यात आले असून शेती उत्पादन वाढविणे, सिंचन सुविधा मजबूत करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे या उद्दिष्टांवर भर देण्यात आला आहे. कृषी पायाभूत सुविधा मजबूत करण्याबरोबरच कृषी प्रक्रिया आणि मूल्यवर्धन उद्योगांना प्रोत्साहन देण्याचीही घोषणा करण्यात आली.

याशिवाय शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी वाढवण्यावरही अर्थसंकल्पात विशेष लक्ष देण्यात आले आहे. औद्योगिक वाढ आणि कौशल्य विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून राज्यातील युवकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्याचे सरकारचे लक्ष्य असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले."विकसित महाराष्ट्र २०४७" या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून राज्याच्या विकासाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. मजबूत अर्थव्यवस्था, आधुनिक पायाभूत सुविधा, शाश्वत विकास आणि सर्वसमावेशक सामाजिक प्रगती या चार स्तंभांवर हा आराखडा उभा राहणार आहे. आगामी काळात महाराष्ट्र देशाच्या आर्थिक विकासात अग्रस्थानी राहील आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक राज्य म्हणून उदयास येईल, असा विश्वास मुख्यमंत्री यांनी व्यक्त केला.

# जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या बैठकीत गावगाड्यातील शेतकरी पोहोचला"

## युवा शेतकरी नागेश गंगावाणे म्हणाले – पैसा नाही, पण सोन्यासारखी माणसं कमावली

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्यात आयोजित करण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज 'महाराजस्व समाधान' शिबिराच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीत गावगाड्यातील सामान्य शेतकरी आणि युवा कार्यकर्ते नागेश गंगावाणे यांना सहभागी होण्याची संधी मिळाल्याने सर्वत्र कौतुक व्यक्त होत आहे.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच प्रतिनिधी उपस्थित



होते. अशा महत्त्वाच्या बैठकीत एका सामान्य शेतकरी कुटुंबातील युवकाला चर्चेचा भाग बनण्याची संधी मिळणे हा त्यांच्यासाठी अभिमानाचा क्षण ठरला.

याबाबत आपल्या भावना व्यक्त करताना नागेश गंगावाणे म्हणाले की, "आजचा दिवस माझ्यासाठी सुवर्ण दिवसासारखा आहे. मी एक सामान्य

> **"मी गावातील एक सामान्य शेतकरी आहे. तरीही जिल्हाधिकारी बैठकीत सहभागी होण्याची संधी मिळाली, हा माझ्यासाठी आयुष्यातील मोठा सन्मान आहे. पैसा नसला तरी सोन्यासारखी माणसं कमावली, यातच माझं समाधान आहे."**
>
> **— नागेश गंगावाणे, शेतकरी युवा कार्यकर्ते**

गावगाड्यातील शेतकरी असूनही जिल्हाधिकारी साहेबांनी मला या महत्त्वाच्या बैठकीत बोलावले, ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. कुठे जिल्हाधिकारी साहेब आणि कुठे मी... पण आज मला या चर्चेचा एक भाग बनण्याची संधी मिळाली."

ते पुढे म्हणाले की, "आयुष्यात माझ्याकडे पैसा नसला तरी मी सोन्यासारखी माणसं कमावली आहेत, यातच मी समाधानी आहे. मायबाप जनता, बंधू आणि भगिनींनो तुम्ही आहात म्हणून मी आहे. तुमचे प्रेम आणि आशीर्वाद कायम असेच राहो."

दरम्यान, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीत 'महाराजस्व समाधान' शिबिराच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या महसूल विषयक अडचणी तात्काळ सोडविण्यासाठी हे शिबिर महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# सहा वर्षीय सय्यद आरीशने केला पवित्र रमजानचा पहिला रोजा ( उपवास )

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी):** - पाटोदा शहरातील सय्यद शफीक यांचा मुलगा आरीश याने केवळ सहा वर्षांच्या वयात त्याचा आयुष्यामधील पहिला रोजा(उपवास) ठेवला आहे. दिवसभर उपवास करून आरीश संध्याकाळी रोजा सोडतानाचा सय्यद कुटुंबासाठी तो एक अत्यंत कौतुकास्पद क्षण होता. कारण त्याच्या वयात असा उपवास(रोजा) ठेवणे हे साधारणतः अपवादात्मक असे मानले जाते. आरीशने केलेला हा उपवास त्याच्या संपूर्ण धार्मिक परंपरेनुसार केला. कुटुंबातील सर्व जेष्ठ सदस्यांनी आरीशला धार्मिक श्रद्धा आणि संस्कृतीतून त्याला रोजा ठेवण्यासाठी प्रेरित केले. त्याला एक उत्तम नागरिक आणि धार्मिक विचारांमध्ये प्रगल्भ होण्यासाठी प्रोत्साहित करत आहोत. त्याने आपल्या वयाप्रमाणे उपवास ठेवला त्या मुळे त्याच्यातील आत्मविश्वास वाढला असल्याचे त्याचे वडिल सय्यद शफिक यांनी सांगितले. आरीशने या वयात केलेल्या उपवासाबद्दल सय्यद परिवारासह मित्रांनीही अभिनंदन केले आहे. आणि त्याच्या धार्मिक शिस्त आणि कष्टांची प्रशंसा केली आहे.



# भावना ग्रुप नवी मुंबई येथे रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल/प्रतिनिधी :** भावना ग्रुप नवी मुंबई येथे कर्मचाऱ्यांसाठी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले, या रक्तदान शिबिराची संकल्पना भावना ग्रुपचे मालक राजेश शहा, अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनात राबवण्यात आली, शिबिरामध्ये जे जे महानगर ब्लड बँक (SBTC) भायखळा मुंबई, येथून डॉक्टर एवं नर्स यांची उपस्थिती होती.भावना ग्रुपचे मालक हे आपल्या कर्मचाऱ्यांकडे केवळ



कर्मचारी नसून पारिवारिक दृष्टीने पाहतात हे यावेळी दिसून आले. कर्मचाऱ्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीला देखील मजबुती देण्याचे कार्य हे घडताना दिसून येत आहे. भावना ग्रुप नेहमी नवनवीन उपक्रमांद्वारे सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे मालक व कर्मचारी यामधील नातं नेहमी जोडण्याचे आणि टिकवण्याचे हेतू प्रत कार्यशील आहे हे जाणवते.

# बेकायदेशीर ओव्हरलोड मालवाहतूक तात्काळ बंद; धर्मवीर वाहतूक सेनेची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** बेकायदेशीर ओव्हरलोड मालवाहतूक तात्काळ बंद करण्यात यावी अशी मागणी धर्मवीर वाहतूक सेनातर्फे पनवेल प्रादेशिक परिवहन यांना निवेदनद्वारे करण्यात आली.

कळंबोली स्टील मार्केट तसेच इतर औद्योगिक परिसरात अवजड वाहनांकडून होत असलेल्या बेकायदेशीर ओव्हरलोड मालवाहतुकीमुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर हानी होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होत आहे.या पार्श्वभूमीवर



मोटार वाहन अधिनियम १९८८ अंतर्गत कठोर कारवाई करून ही बेकायदेशीर ओव्हरलोड मालवाहतूक तात्काळ बंद करण्यात यावी, या मागणीसाठी मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,पनवेल जयंत चव्हाण यांना निवेदन देण्यात आले.यावेळी धर्मवीर वाहतूक सेना महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष रामदास शेवाळे, उपाध्यक्ष पुण्यवंत खटकाळे तसेच अमोल काटकर, कुलदीप सिंग, संजय साळुंखे, अण्णासाहेब जाधव व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# खमारी ( बुटी ) येथे सरपंचांवर पदाचा गैरवापर केल्याचा आरोप ; तहसीलदारांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/लाखनी भंडारा** : तालुक्यातील खमारी (बुटी) गावातील सरपंच नलिनी काळे या आपल्या पदाचा गैरवापर करून एका व्यक्तीला हेतुपुरस्सर त्रास देत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत तहसीलदारांना निवेदन देऊन चौकशीची मागणी करण्यात आली आहे.निवेदनानुसार, पुरुषोत्तम मेश्राम यांना लक्ष्य करून त्यांच्या घरासमोरील अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली त्रास दिला जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. संबंधित घर १९७९ पासून अस्तित्वात असून त्या घराचा कर नियमित भरला जात असल्याचेही निवेदनात सांगण्यात आले आहे. तसेच ग्रामसेवकांना डावलून सरपंच मनमर्जीने कारभार करत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दि. ६ मार्च २०२६ रोजी आझाद समाज पार्टी (कांशीराम ) च्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी आझाद समाज पार्टीचे संतोष ऊकणकर ( जिल्हा महासचिव ), युगांतर मेश्राम (भंडारा तालुकाध्यक्ष), ग्यानचंद जांभुळकर (पूर्व विदर्भ सचिव), रवींद्र जनबंधू (भंडारा जिल्हा सचिव), मंगेश नंदेश्वर, अश्विन गोस्वामी व अमोल भिवगडे उपस्थित होते.

# अर्थसंकल्पात केवळ मोठे आकडे व पोकळ घोषणा, प्रत्यक्षात राज्याची वाटचाल दिवाळखोरीकडे: हर्षवर्धन सपकाळ

## तिसरी व चौथी मुंबई, शक्तीपीठ महामार्ग अदानी अंबानीच्या फायद्यासाठी, सर्वसामान्य जनतेला अर्थसंकल्पात स्थान नाही

## ‘विकसीत महाराष्ट्र २०४७’ चे गुलाबी स्वप्न दाखवून लाडक्या बहिणींना पुन्हा फसवले

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी/अरविंद बनसोडे कुरनूरकर** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात केवळ मोठे आकडेवारी व पोकळ घोषणा आहेत.या सरकारने राज्यावर कर्जाचा डोंगर करून ठेवलेला असून ४० हजार कोटी रुपयांच्या तुटीचा हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला दिवाळखोरीकडे घेऊन जाणारा आहे. आज या अर्थसंकल्पात बुलेट ट्रेन, मेट्रो, भुयारी मार्गांचाच बोलबाला आहे. गाव खेड्यातला गरीब, आदिवासी, कष्टकरी, महिला, बेरोजगार व तरुणांना या सर्व अर्थसंकल्पात स्थानच नाही. एकंदरीत हा अर्थसंकल्प मोजकीच शहरे आणि मोजक्या लोकांसाठीच आहे. आज सर्वसामान्यांना यातून काहीही मिळणार नाही, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

आज या अर्थसंकल्पावर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, या विकसीत महाराष्ट्र २०४७ ची कल्पना व १ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था हे दिवास्वप्न आहे. मागील काही वर्षात भाजपा युती सरकार अर्थसंकल्प जाहीर करते व नंतर येणाऱ्या प्रत्येक अधिवेशनात कोट्यवधी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या जातात. आर्थिक पाहणी अहवालातून राज्य दिवाळखोरीकडे जात असल्याचे दिसून आले आहे.या राज्यावरील कर्ज व कर्जाची हमीभाव मिळून १२ लाख कोटींच्यावर आसपास बोजा आहे.या सर्व कर्जाच्या हप्त्यापोटी ६५ हजार कोटी रुपये द्यावे लागतात. त्यामुळे अर्थसंकल्पातील आकडे व प्रत्यक्ष जमिनीवरची स्थिती यात प्रचंड तफावत आहे. गेल्या अर्थससंकल्पात अनुसुचित जातींच्या योजनांसाठी २२ हजार ६५८ कोटींची तरतूद केली होती पण प्रत्यक्षात ६ हजार २०० कोटी रुपयेच खर्च करण्यात आले.




मागासवर्गीय, अल्पसंख्याक, आदिवासी यांच्या योजनांवर अर्थसंकल्पात मोठ मोठे आकडे जाहीर केले जातात पण प्रत्यक्षात ते खर्च केले जात नाहीत.

आज हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, या राज्यासमोर सर्वात मोठे संकट बेरोजगारीचे असताना अर्थसंल्पात केवळ ७५ हजार नोकर भरतीची घोषणा करण्यात आलेली आहे. आजपर्यंतच्या मेगा भरतीचा भाजपा सरकारचा इतिहास पाहता ही सुद्धा एक फसवी घोषणाच वाटते. लाडकी बहिण योजना बंद होणार नाही असे सांगितले असले तरी २१०० कोटी रुपये देण्याचे आश्वासन अद्याप हवेतच आहे. सरकारने लाडक्या बहिणींची पुन्हा फसवणूक केली आहे. कर्जमाफीची घोषणा केली असली तरी फडणवीस सरकारने आधी जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेतील लाखो शेतकरी आजही कर्जमाफीच्या लाभापासून वंचितच आहेत, हे पाहता आजच्या कर्जमाफीची घोषणा शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणारी ठरु नये. लबाडाचे आवताण जेवल्याशिवाय खरे नाही असे या सरकारचे वागणे आहे. शेतकरी व कृषी क्षेत्रासाठी काही घोषणा केलेल्या आहेत पण अमेरिकेसोबत केलेल्या व्यापारी करारापुढे आपल्या शेतकऱ्यांच्या शेतमालाचा भाव मिळणे कठीण आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्याऐवजी घटण्याचीच भिती जास्त आहे. शेतकरी आत्महत्या थांबवण्यास अर्थसंकल्पातील घोषणा पुरेशा नाहीत. गेल्या वर्षी चांगला पाऊस पडूनही राज्याचे सिंचन क्षेत्र ५६ लाख हेक्टरवरून कमी होऊन ३९ लाख हेक्टरपर्यंत आले आहे. सिंचनासोबतच पेरणीयोग्य क्षेत्रातही घट झाली आहे. यावरून सरकारने शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडल्याचे दिसून येत आहे.

तिसरी मुंबई, चौथी मुंबई, शक्तीपीठ महामार्ग, वाढवण बंदर हे अदानी व अंबानी यांच्या हितासाठी आहे, यातून सामान्य जनतेला काही फायदा होणार नाही. सरकारचे सौरउर्जा धोरणही फसवे आहे, त्यामुळे वीज ग्राहकांवर दिलासा नाही तर प्रति युनिट २६ पैसे अतिरिक्त भार पडणार आहे.

स्मार्टमीटरमुळे अगोदरच वीजबिलात प्रचंड वाढ झालेली आहे. दावोसमधून २०२२ ते २०२५ पर्यंत ५० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार झाल्याचा दावा करण्यात आला पण आर्थिक पाहणी अहवालानुसार तर राज्यात फक्त ६ लाख कोटी रुपयांचीच गुंतवणूक आलेली आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# कृषी विभागाच्या अनुदान फसवणुकीची मोठी चर्चा

## देवणी तालुक्यात शेतकऱ्यांचे अनुदान रखडले

**दैनिक युवक आधार**

**लातूर /देवणी/पांडुरंग कदम/तालुका (लातूर जिल्हा):** महाराष्ट्र कृषी शेतकी विभागाच्या शेतकरी अनुदान योजनेतील गैरव्यवहार आणि फसवणुकीचे आरोप आता जोर धरू लागले आहेत. 2025-26 च्या सोलार फवारा कृषी यांत्रिकीकरणासाठी शेतकऱ्यांना 50% अनुदान मिळविण्याचे आश्वासन देऊन पाटील ॲग्रो एजन्सीने देवणी येथे शेतकऱ्यांना सोलार यंत्र खरेदी करण्यासाठी आमंत्रित केले. शेतकऱ्यांनी रोख रक्कम देऊन सोलार यंत्र घेतले, आणि यंत्रांच्या फोटो कागदपत्रांसह अहवाल कृषी कार्यालयात सादर करण्यात आले.तथापि, चार-पाच महिने उलटून गेले असून, अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली नाही. कृषी कार्यालयाने चौकशी केली असता, "अनुदान प्राप्त झाल्यावर शेतकऱ्यांच्या खात्यात 50% अनुदान जमा करण्यात येईल," असे सांगण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.




तालुक्यातील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, अनुदान नसताना कृषी विभागाने ऑनलाइन सोडत काढून शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. पाटील ॲग्रो एजन्सी आणि कृषी विभाग यांच्यात आर्थिक संबंध असल्याचे शेतकऱ्यांच्या चर्चांमध्ये व्यक्त होत आहे, आणि अनुदान प्राप्त होण्याच्या प्रतीक्षेत शेतकरी आहेत.या प्रकरणावर कायदेशीर तपासणीची आवश्यकता असून, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी उचित कार्यवाही केली जावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

संपूर्ण प्रकरणाची तपासणी आणि शेतकऱ्यांचे हक्क व त्यांचा न्याय मिळवण्यासाठी कृषी विभाग आणि संबंधित अधिकारी यांचे योग्य पाऊल उचलावे अशी मागणी होत आहे.

# नारायण सुर्वे : कामगार वर्गाचा कवी आणि लोकसंघर्षांचा आवाज

**मुंबईची कामगार वस्ती, गिरण्यांचा गुंज, भरकटलेली स्वप्न, रोजच्या लढाया आणि उद्याची आशा - सुर्वेंची कविता या सगळ्या वास्तवांची साक्ष देणारी.**

मराठी साहित्यात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत, ज्यांचे आयुष्य हेच त्यांच्या लेखनाचे विद्यापीठ ठरते. नारायण सुर्वे हे त्यापैकी एक तेजस्वी नाव. १५ ऑक्टोबर १९२६ रोजी जन्मलेले आणि १६ ऑगस्ट २०१० रोजी अनंतात विलीन झालेले सुर्वे हे फक्त कवी नव्हते, तर कामगारांच्या जगण्याचे विश्व त्यांनी शब्दबद्ध केलेला एक लोककवी होते. शहरी झोपडपट्ट्यांपासून गिरण्यांच्या भडक वातावरणापर्यंत, त्यांनी अनुभवलेली प्रत्येक वेदना, आर्तता आणि आशा त्यांच्या कवितेतून झळाळून दिसते.

**अत्यंत प्रतिकूलतेत गेलेले बालपण**

सुर्वेंचे बालपण हे संघर्षांची साखळी होती. पालकत्व न लाभलेल्या या मुलाचे पालनपोषण मुंबईतील गिरणी



कामगारांच्या वस्तीत झाले. आयुष्याच्या या प्रारंभिक टप्प्यानेच त्यांच्या कवितेला वास्तवाची ताकद, कष्टकऱ्यांच्या मनाचा नाद आणि सामाजिक वेदनांची धार मिळाली.

**नोकऱ्यांचा प्रवास आणि अनुभवांची शिदोरी**

त्यांचा रोजगारप्रवासही तेवढाच कठोर—हॉटेलमधील कामगार, गिरणीत बिगारी, शिपाई, आणि पुढे प्राथमिक शाळेत शिक्षक. या विविध अनुभवांनी त्यांची कविता अधिक मानवी, अधिक जमिनीवरची आणि अधिक जिवंत बनवली. ‘लोकांमध्ये राहून लोकांसाठी लिहिणे’ हेच त्यांच्या लेखनाचे मुख्य तत्त्व होते.

**कामगार वर्गाच्या जीवनाचे काटेकोर चित्रण**

मुंबईची कामगार वस्ती, गिरण्यांचा गूंज, भरकटलेली स्वप्ने, रोजच्या लढाया आणि उद्याची आशा—सुर्वेंची कविता या सगळ्या वास्तवांची साक्ष देणारी. त्यांच्या लेखणीतून आकार घेतलेल्या "नालबंदवाला याकूब" किंवा "गोदीवर काम करणारा अफ्रिकन चाचा" यांसारख्या व्यक्तिरेखा आजही मराठी साहित्यातील जिवंत चेहऱ्यांप्रमाणे उभ्या राहतात.

**मार्क्सवादी विचारांचा ठसा**

सुर्वेंच्या कवितांवर मार्क्सवादी विचारसरणीचा स्पष्ट प्रभाव जाणवतो. समाजपरिवर्तन, समानता, स्वाभिमान आणि संघर्ष या त्यांच्या कविता केवळ शब्दांची मांडणी नसून विचारांना दिशा देणारे दर्पण ठरतात. त्यांनी साहित्याला वर्गसंघर्षाचे तत्त्वज्ञान दिले, आणि कवितेला रस्त्यावर उतरवून लोकांचे हक्क सांगण्यासाठी सज्ज केले.

**प्रमुख काव्यसंग्रह**

माझे विद्यापीठ (१९६६) – स्वतःच्या आयुष्याला विद्यापीठ मानणारा कवी.

जाहिरनामा – समाजपरीवर्तनाच्या लढ्याची हाक.

नालबंदवाला याकूब – उपेक्षित लोकांच्या आयुष्याचा धगधगता दस्तऐवज.

पद्मश्री सन्मान (१९९८)

साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यगौरव म्हणून भारत सरकारने १९९८ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. हा सन्मान कामगारांच्या वेदना आणि आकांक्षा लिहिणाऱ्या कवीच्या शब्दांना मिळालेली राष्ट्रीय पातळीवरील दखल होती.

**सुर्वे यांच्या नावाची कलाअकादमी**

त्यांच्या निधनानंतरही सुर्वेंचे कार्य तितक्याच तेजाने प्रेरणा देत राहिले. तळागाळातील कलाकारांना व्यासपीठ मिळावे यासाठी **‘नारायण सुर्वे कला अकादमी’ची स्थापना करण्यात आली—समाजासाठी लिहिणाऱ्या कवीच्या वारशाला दिलेली ही सन्मानाची सलामी.

**लेखक : प्रसाद हनुमंते**

# कांदा लागवड आणि उत्पादनाचे गणित

**रोजच्या आहारातील मोठ्या वापरामुळे कांद्याला सतत मागणी असते. त्यानुसार कांद्याचे उत्पादनही मोठ्या प्रमाणात घेतले जाते. या उत्पादनाचे गणित फसले की, कांद्याच्या दरातील चढ आणि उताराच्या बातम्याही कानी येतात. यंदा राज्यात रब्बी हंगामात कांदा लागवड क्षेत्रात मोठी वाढ झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. कांद्याच्या लागवडीपासून उत्पादनापर्यंतचे हे गणित...**

राज्यात यंदा रब्बी हंगामात कांदा लागवड क्षेत्रात मोठी वाढ झाल्याची आकडेवारी अलीकडेच समोर आली. पाऊसमान चांगले राहिल्याने ही वाढ स्वाभाविक मानली जाते. खरिपातील नुकसान भरून काढण्यासाठी अनेकांनी रब्बीत कांद्याला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे उत्पादनात वाढ होणार असली तरी बदलते हवामान आणि वाढता उत्पादन खर्चाचा प्रभाव त्यावर पडणार आहे.

राज्यात वर्षभरात खरीप, उशिराचा खरीप म्हणजे लेट खरीप आणि रब्बी या तीन हंगामात कांदा पीक घेतले जाते. कृषी विभागाच्या माहितीनुसार कांदा लागवडीखालील एकूण क्षेत्र १० लाख हेक्टरच्या आसपास आहे. यामध्ये रब्बी हंगामात सर्वाधिक साडेसहा लाख हेक्टर क्षेत्रावर कांदा लागवड होते. खरीप आणि उशिराच्या खरिपाची लागवड तुलनेत बरीच कमी असते. रब्बीची लागवड नोव्हेंबर ते जानेवारी या कालावधीत केली जाते. यंदा ही लागवड पूर्ण झालेली आहे. नोव्हेंबरच्या सुरुवातीपर्यंत पाऊस राहिल्याने कांदा रोपांचे नुकसान झाले, ज्यामुळे अनेकांना एक-दोनवेळा बियाणे खरेदी करून पुनर्लागवडीची वेळ आल्याचे शेतकरी सांगतात. कांद्याचे बियाणे दोन प्रकारात उपलब्ध होते. एक जे शेतकरी स्वत: रोपांपासून तयार करतो. आणि दुसरे खासगी कंपन्यांचे बियाणे. यावेळी पावसात रोपे खराब झाल्याने दुबार पेरणीची वेळ आली. रोपे नैसर्गिक संकटात सापडल्याने बाजारातील खासगी कंपन्यांच्या बियाण्यांचे प्रति किलो दोन हजार रुपये दर तीन हजारांवर गेले होते.

उन्हाळ कांद्याची नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या महिन्यांमध्ये लागवड झाली. सुरुवातीला कांदा रोपे तयार होण्यासाठी ४५ दिवस लागतात. ही रोपे लागवड केल्यानंतर रब्बी कांदा तयार होण्यास ११० ते १२० दिवसांचा कालावधी लागतो. त्याची प्रति एकरी १५ ते १८ मेट्रीक टन उत्पादकता आहे. खरीप आणि लेट खरीपच्या तुलनेत उन्हाळची उत्पादकता जास्त असते. त्यातही खरीप व उशिराचा खरीप कांद्याला फारसे आयुर्मान नसते. उन्हाळ कांद्याचे आयुर्मान अधिक असते. चांगला भाव येईपर्यंत तो चाळीत ठेवता येतो. त्यामुळे बाजारातील चढ-उताराचा विचार न करता उन्हाळ कांद्याला शेतकरी वर्गाकडून



नेहमीच पसंती मिळते. पावसामुळे खरिपातील कांद्याचे मोठे नुकसान झाले होते. अतिवृष्टीमुळे दुष्काळग्रस्त भागात पाणी आहे. खरिपातील नुकसान भरून काढण्यासाठी येथील शेतकरी रब्बीच्या कांदा लागवडीकडे वळतील, हा कृषी विभागाचा अंदाज वाढलेल्या लागवडीशी मेळ साधणारा आहे.

शेतकऱ्याने स्वत: तयार केलेल्या बियाण्यांची उत्पादकता आणि खासगी कंपनीच्या बियाण्यांची उत्पादकता यात फरक पडतो. स्वत: तयार केलल्या बियाण्यांची त्याला खात्री असते. कारण, आपल्या शेतात पिकलेल्या कांद्यातून दर्जेदार कांदा तो स्वत: बाजुला काढतो. नंतर वाफा पद्धतीने कमी क्षेत्रात लागवड करतो. उगवण होऊन फुल व नंतर गोंडे झाल्यावर काळ्या बिया तयार होतात. हेच बियाणे तो वापरतो. चांगल्या दर्जाच्या कांद्यापासून पारंपरिक पद्धतीने ते तयार केले जातात. ज्यांच्याकडे अशा प्रकारचे बियाणे नसते, त्यांना दुसऱ्या शेतकऱ्याकडून घेणे अथवा खासगी कंपनीच्या बियाण्यांशिवाय पर्याय नसतो. यावेळी शेतकऱ्याने तयार केलेल्या कांदा रोपांनाही पावसाचा फटका बसला. त्यामुळे अनेकांना खासगी कंपनीचे बियाणे वाढीव दराने खरेदी करावी लागली.वाढता उत्पादन खर्च, हवामानाचा लहरीपणा आणि मजुरांची टंचाई हे आज कांदा शेतीसमोर मोठे आव्हान आहे. या शेतीचे समीकरण महाराष्ट्र कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे मांडतात. एकत्रित कुटुंबात पूर्वी सहज उपलब्ध होणारे मनुष्यबळ विभक्त कुटुंबात दुरापास्त झाले. ग्रामीण भागातील तरुण मंडळी शिक्षण, नोकरीनिमित्त गावाबाहेर पडली. मजुरांवर शेतीची भिस्त असते. कांदा शेतीत लागवड, निंदणी, खुरपणी आणि शेवटी काढणीपर्यंत मजूर लागतात. यावर एकही ३५ ते ४० हजार रुपये खर्च होतो. एक एकर क्षेत्राला दोन किलो बियाणे लागतात. त्यावर यावेळी सहा हजार रुपये खर्च झाले, रब्बी कांद्याला किमान तीन वेळा रासायनिक खतांचा डोस दिला जातो, शेणखतही वापरले जाते. वातावरण खराब झाल्यास औषधाचा खर्च वाढतो. नांगरणीसाठी ट्रॅक्टर, ठिबक असेल तोही खर्च वाढतो. या सर्वाची गोळाबेरीज केल्यास एक एकर रब्बी कांद्यासाठी एक लाख रुपयांहून अधिक खर्च येत असल्याचे लक्षात येते. यावेळी लागवड अधिक असल्याने सारे काही सुरळीत पार पडले तर उत्पादनात वाढ होईल. एकरी १५ मेट्रीक टन उत्पादन झाले तरी आकारमानानुसार प्रतवारी होऊन दरही कमी-जास्त मिळतात, याचा दाखला दिला जातो.

**वातावरणाचे परिणाम, उपाय**

कांदा पिकात ढगाळ वातावरण आणि कमी सूर्यप्रकाश यामुळे प्रकाश संश्लेषण क्रियेत अडथळा निर्माण होतो. त्यामुळे अन्न निर्मिती कमी होते. पिकाची वाढ नीट न झाल्यामुळे कांदा नीट पोसत नाही. पिकाची रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊन रोगांना बळी पडतो, त्यामुळे मोठ्या प्रमाणात पिकाचे नुकसान होण्याचा संभव असतो. जास्त आर्द्रता आणि सरासरी कमाल तापमान २१ ते ३० अंश सेल्सिअस कांदा पिकावरील रोगांसाठी पोषक वातावरण ठरते. पर्पल ब्लॉच किंवा जांभळा करपा पानांवर सुरुवातीला पांढरे डाग पडतात. त्यामुळे अवेळी पान गळते. त्याचा परिणाम कांद्याच्या वाढीवर होतो. डाऊनी मिल्ड्यू आणि स्टेम फायलम ब्लाइट रोगांची वाढ होण्यासाठी असे वातावरण पोषक ठरते. त्यामुळे पाने पिवळी पडून वाळतात. कधीकधी पानांवर पांढरे डाग पडून पिळ पडतो. बदलत्या वातावरणात फुलकिड्यांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. यावर जमिनीतील पाण्याचा निचरा करावा. शिफारशीत कीडनाशकांची फवारणी करावी. फवारणीबरोबर चिकट द्रव वापरावे, जेणेकरून ढगाळ वातावरण आणि हलक्या पावसामुळे फवारणी केलेले द्रावण धुवून जाणार नाही. उन्हाळी हंगामात फुलकिडे या किडीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होतो. त्यासाठी उपाय योजना कराव्यात. जास्त तापमानामुळे कांद्याच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. पिकावर ताणाची परिस्थिती निर्माण होते. कांद्याची नीट वाढ होत नाही. कांदा पोसत नाही, बारीक राहतो. योग्य पाणी व्यवस्थापन करावे. ठिबक किंवा तुषार सिंचनामुळे फायदा होतो.

**डॉ. भरत मालुंजकर**